नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक १२७ * * अमरावती * सोमवार, दिनांक १० नोव्हेंबर २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू

■ वृत्तसंस्था, कटक, दि. ९ :

ओडिशातील कटक येथील बक्सी बाजार परिसरात शनिवारी संध्याकाळी एक मोठा अपघात घडला. मनीसाहू चौकाजवळील एका जीर्ण इमारतीच्या बाल्कनीचा काही भाग अचानक कोसळला. या दुर्दैवी अपघातात एकाच कुटुंबातील तीन जणांचा मृत्यू झाला आणि चार जण गंभीर जखमी झाले, त्यामुळे संपूर्ण परिसरात घबराट पसरली. शनिवारी संध्याकाळी उशिरा ही दुर्घटना घडली. मिळालेल्या माहितीनुसार, हदीबंधू शाळेजवळील एका जुन्या, जीर्ण इमारतीची बाल्कनी अचानक कोसळली आणि खाली पडली. जवळच उभे असलेले एक कुटुंब ढिगाऱ्याखाली अडकले. डॉक्टरांनी तीन जणांना मृत घोषित केले आहे.



अग्राग्रलेख

खरीखरी..

## भाजपला तरी कुठे हवे आहे?

आज महाराष्ट्राचे नेते शरद पवार यांनी काहीही झाले तरी भाजप बरोबर युती नको असे स्पष्ट केलेले आहे. शरद पवार हे आधी शरद पवार होते, नंतर ही शरद पवार आहेत. ते शरद दादा मात्र कधीच झालेले नाहीत. पण भाजप बरोबर युती का नको याचा खुलासा ते करत नाहीत. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदावर वसंतदादा असताना उपमुख्यमंत्री नासिकराव तिरपुडे होते. साध्या स्वभावाचे वसंत दादा आणि तिखट स्वभावाचे तिरपुडे यांची युती फार काळ टिकली नाही, शरद पवार यांनी त्यावेळी पुलोदचा म्हणजेच पुरोगामी लोकशाही दल या नावाने प्रयोग केला आणि पुलोदचे नवीन सरकार आणले. तेव्हा शरद पवार स्वतः मुख्यमंत्री झाले. त्यांच्या मंत्रिमंडळात भारतीय जनता पक्षाचे हशू आडवाणी, महादेवराव शिवणकर वगैरे सारखे मंत्री होते. तसेच शेकापचे गणपतराव देशमुख हेही मंत्री होते. त्या वेळच्या भाजपच्या मंत्र्यांबरोबर शरदरावांनी अत्यंत चांगल्या प्रकारे सरकार चालवल्याचे लोक म्हणत असतात. १९८० सालामध्ये इंदिरा गांधी पुन्हा सत्तेवर आल्या आणि त्यांनी शरद पवार यांचे पुलोद सरकार बरखास्त केले, तेव्हा भारतीय जनता पक्षाबरोबर युती करूच नये असे शरद पवार यांचे त्यावेळचे मनोगत अजिबात नव्हते. आजच्या घडीला जुना भारतीय जनता पक्ष उरलेला नाही. आता भाजपचा विशाल वटवृक्ष झालेला आहे. पवार साहेबांचे ७५ टक्के केले भाजपच्या मंत्रिमंडळामध्ये आहेत आता भारतीय जनता पक्षाला शरद पवार तर सोडा, कोणाचीही गरज नाही. जेव्हा गरज होती तेव्हा शिवसेना फोडून सरकार बनवण्यात आले. त्यानंतर अजित दादांना लक्ष्य करून लक्ष्यभेद केला आणि शिवसेने सोबत त्यांनाही बरोबर घेतले गेले. विधानसभेच्या निवडणूकी नंतर भारतीय जनता पक्षाला खरे तर दोघांचीही गरज पडलेली नाही. दहा-पंधरा अपक्ष आमदारांना सोबत घेऊन किंवा सत्तेसोबत असलेल्या पक्षातील काही आमदारांना सोबत घेऊन सहजपणे सरकार चालवता येते. हे भारतीय जनता पक्षाला पुरते कळून चुकलेले आहे. त्यामुळे आता शिवसेना काय किंवा राष्ट्रवादी काय या दोघांनाही सरकारमध्ये राहण्यासाठी भारतीय जनता पक्ष म्हणेल त्याप्रमाणे त्यांना वागावे लागेल, कारण त्यांना सत्तेत राहायचे आहे. शरद पवार साहेबांना गेल्या लोकसभेत मिळालेले यश विधानसभेत टिकू शकलेले नाही. ही गोष्ट केवळ त्यांचीच नाही, तर काँग्रेस पक्ष आणि उबाठा शिवसेनेची विधानसभेत पार वाताहत झाली आहे. साधा विरोधी पक्ष होण्यासाठी आवश्यक तेवढे आमदारही एकाही पक्षाजवळ नाहीत. अशा परिस्थितीत भारतीय जनता पक्षाबरोबर युती नको असे म्हणून पवार साहेबांनी कितीही घोषणा केल्या. तरी जेव्हा भारतीय जनता पक्षच तयार नाही तेव्हा त्यांच्या बरोबर? युती कशी होणार. बदललेल्या राजकीय परिस्थितीत आगामी काळामध्ये ज्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका होणार आहेत. त्या निवडणुकीत सध्या जे जे युतीमधील पक्ष आहेत त्यांना डावलून भारतीय जनता पक्षाला स्वतःच्या बळावर महाराष्ट्रातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्था काबीज करायच्या आहेत. सध्या भाजप जवळ महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीस यांच्यासारखा प्रभावी कुशल संघटक नेता आहे. कोणत्या गोट्या कशा फिरवाव्यात, यामध्ये एकेकाळी खुद्द शरद पवार पारंगत होते. आता ते काम करण्याची कुशलता देवेंद्र फडणवीस यांनी मिळवलेली आहे. अशा एकूण परिस्थितीत शरद पवार यांच्या भारतीय जनता पक्षाबरोबर युती न करण्याचा इरादा कितीही उच्च दर्जाचा असला, तरी अशा प्रकारची युती होईल अशी साधी आशाही दिसून येत नाही. मध्यंतरीच्या काळात दादा आणि त्यांचे काका यांच्यामध्ये मनोमिलन घडवून आणण्याचा प्रयत्न काही लोकांनी सुरू केल्याचे ऐकिवात आहे. त्यातही फारसे कोणाला यश आलेले नाही. आता सरकारमधील कोष्टक फारसे बदलेल असे वाटत नाही. यामुळेच पवार साहेबांना ही गुगली वाटत असली तरी याच गुगलीचा सिक्सर मारण्यासाठी उपयोग होऊ शकतो. त्यासाठी सध्याचे सत्ताधीश समर्थ आहेत असेच आम्हाला वाटते.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

### १ रुपयाचा व्यवहार न करता कागद कसा तयार झाला?

## मुंढवा जमीन प्रकरणावर अजित पवारांचा सवाल

■ महासागर प्रतिनिधी,
पुणे, दि. ९ :

पुण्यातील बहुचर्चित मुंढवा जमीन गैरव्यवहार प्रकरणावरून विरोधी पक्षांनी केलेल्या आरोपांवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज बारामती येथे माध्यमांसमोर मन मोकळे केले. पार्थ पवार यांच्या 'अमेडिया' कंपनीमार्फत करण्यात आलेला हा जमीन खरेदीचा व्यवहार नंतर रद्द करण्यात आला असला तरी, या अनुषंगाने उपस्थित झालेल्या प्रश्नांची उत्तरे देत अजितदादांनी आपल्यावरील जुन्या आरोपांचे 'शल्य' बोलून दाखवले. निवडणुका सुरु झाल्या की आमच्यावर आरोप होतात. याआधी देखील माझ्यावर असेच आरोप झाले. पण त्यातून काही निष्पन्न झाले नाही. मात्र बदनामी झाली, असे अजित पवार म्हणालेत.

मुंढवा आणि बोपोडी येथील कथित शासकीय जमीन खरेदी प्रकरणावरून मोठा वाद निर्माण झाला आहे. या जमिनीचा व्यवहार अजित पवारांचे सुपुत्र पार्थ पवार यांच्या कंपनीने केला असून, १८०० कोटींची जमीन ३०० कोटींत खरेदी केल्याचा आरोप विरोधकांकडून होत आहे.



या प्रकरणात तिघांवर गुन्हा दाखल झाला असला, तर पार्थ पवारांवर कोणताही गुन्हा दाखल झालेला नाही. त्यामुळे विरोधकांनी अजित पवारांना धारेवर धरले असून, त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे. या सर्व प्रकरणावर आज अजित पवार यांनी माध्यमांशी बोलताना आपले मन मोकळे केले.

मुंढवा प्रकरणातील कथित कागदपत्रांवर आश्चर्य व्यक्त करताना अजित पवार म्हणाले, "१ रुपयाचा व्यवहार न करता नुसते आकडे लिहून कसा काय कागद तयार होऊ शकतो? हे आजपर्यंत मला कळलेले नाही. मी पण आश्चर्यचकित झालो. या प्रकरणातील नोंदणी प्रक्रियेवर त्यांनी थेट बोट ठेवत प्रशासकीय यंत्रणेवर प्रश्न उपस्थित केला. ज्या रजिस्टर ऑफिसच्या व्यक्तीने ही नोंदणी केली, त्याने अशी नोंदणी कशामुळे केली? काय असे घडले की त्याने चुकीचे काम केले? असा सवाल त्यांनी केला. याविषयीची वस्तूस्थिती एका महिन्यात कळेल, असेही सूतोवाच त्यांनी केले.

विरोधकांकडून होणारे आरोप हे निवडणुकीच्या तोंडावर जाणीवपूर्वक केले जातात, असे शल्य अजित पवार यांनी बोलून दाखवले. ते म्हणाले, मुख्यमंत्र्यांनी चांगले अधिकारी चौकशी समितीत घेतले आहेत, त्यामुळे महिन्याभरात वस्तुस्थिती समोर येईल. निवडणुका सुरू झाल्या की आमच्यावर आरोप सुरु होतात. कुठूनतरी, काहीतरी असे काहीतरी बाहेर आणले जाते. यावेळी त्यांनी २००८-०९ मधील ७० हजार कोटींच्या आरोपांची आठवण करून दिली. तुम्हाला आठवत असेल तर २००८ अथवा २००९ मध्ये असंच माझ्याविरोधात ७० हजार कोटींचा आरोप झाला. त्याला १५-१६ वर्षे लोटली. त्यातून कुणीही काहीही पुरावे देऊ शकले नाही. पण आमची बदनामी झाली, असे अजित पवार म्हणालेत.

आपण पारदर्शकपणे काम करत असताना, केवळ राजकीय हेतुने बदनामी केली जाते, याचे दुःख त्यांनी व्यक्त केले. सकाळपासून रात्रीपर्यंत लोकांची कामं करायची. पारदर्शकता कशी राहील ते बघायचे. नियमाला धरून सगळे करायचे... चूक होणार नाही त्याची काळजी घ्यायची आणि लगेच बारामतीतील कुठल्या कुठल्या जमिनीचे काहीही काढायला लागले," असे ते म्हणाले. तसेच माझ्या राजकीय कारकिर्दीला सुरुवात झाल्यापासून मी कुठलीही चुकीची गोष्ट होऊ देत नाही, असेही त्यांनी विरोधकांना ठणकावून सांगितले. मुंबईतही सांगितले, पुण्यातही आणि आता इथे ही सांगतो की माझ्या नावाचा वापर करून, मग माझे जवळचे नातेवाईक, कार्यकर्ते, अधिकारी असतील, त्यांनी जरी यदाकदाचित काही सांगितले, ते जर नियमाला धरून नसेल, तर संबंधित अधिकाऱ्याने ते काम करता कामा नये, असा सज्जड दम अजितदादांनी या पत्रकार परिषदेतून दिला.

## दहशतवाद्यांना मदत करणारे पोलिस अधिकारी निलंबित

■ वृत्तसंस्था, कठुआ, दि. ९ :

जम्मू आणि काश्मीरच्या कठुआ जिल्ह्यातील दोन विशेष पोलिस अधिकाऱ्यांना (एसपीओ) दहशतवाद्यांशी संबंध असल्याच्या आरोपावरून सेवेतून काढून टाकण्यात आले आहे, असे अधिकाऱ्यांनी रविवारी सांगितले. अधिकाऱ्यांनी सांगितले की एसपीओ अब्दुल लतीफ आणि मोहम्मद अब्बास यांना यापूर्वी दहशतवादी कारवायांमध्ये सहभागी असल्याबद्दल अटक करण्यात आली होती.

त्यांनी सांगितले की कठुआच्या वरिष्ठ पोलिस अधीक्षक मोहिता शर्मा यांनी दोन्ही एसपीओंना तात्काळ प्रभावाने बडतर्फ करण्याचे आदेश दिले. दोन्ही अधिकाऱ्यांवर दहशतवाद्यांना मदत केल्याचा आरोप आहे. दरम्यान, जम्मूमध्ये दहशतवादविरोधी मोहीम राबवण्यात आली, अनेक ठिकाणी छापे टाकण्यात आले. जम्मू आणि काश्मीर पोलिसांनी दहशतवादी संघटनांविरुद्ध सुरू असलेल्या कारवाया जम्मूच्या विविध भागात वाढवल्या, ज्यामध्ये स्थानिक दहशतवाद्यांना आणि पाकिस्तानमधून कार्यरत असलेल्या त्यांच्या भूपृष्ठवरील कामगारांना (ओजीडब्ल्यू) लक्ष्य करण्यात आले.

काश्मीरच्या संदर्भात, ओजीडब्ल्यू म्हणजे अशा व्यक्तींचा संदर्भ आहे जे दहशतवाद्यांना उपकरणे पुरवतात आणि त्यांना गुप्त कारवाया करण्यात मदत करतात. अधिकाऱ्यांनी सांगितले की, रामबन, कठुआ आणि राजौरी जिल्ह्यांमधील अनेक ठिकाणी व्यापक शोध आणि घेराव मोहीम सुरू आहे.

## लाडकी बहिण योजना कधीच बंद होणार नाही

■ महासागर प्रतिनिधी, ठाणे, दि. ९ :

कोणी कितीही अफवा पसरवल्या तरी सुद्धा लाडकी बहिण योजना कधीही बंद होणार नाही, असे वक्तव्य उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्यात बोलताना केले. शिवसेना पुरस्कृत साई दर्शन फाउंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या महिला बचत गट स्नेहसंमेलन -२०२५ या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित होते. यावेळी त्यांनी उपस्थित महिलांशी संवाद साधला. या महिला बचत गट स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमाला बहिणीच्या चेहऱ्यावरचा आनंद बघायला आलो आहे. कारण, लाडक्या बहिणींमुळे सव्वा लाखाच्या लीडने मी निवडून आलो, त्यांच्या आशीवार्दाने आमदार झालो. त्यामुळेच मी राज्याचा मुख्यमंत्री पण झालो आणि अडीच वर्ष तुमच्या



सगळ्यांच्या आशीवार्दाने या राज्याची धुरा मला सांभाळायची संधी मिळाली, असे मत उपमुख्यमंत्री शिंदे यांनी मांडले. ते पुढे म्हणाले महिलांसाठी सुरू केलेल्या लाडकी बहिण योजनेतून अनेक छोटे मोठे व्यवसाय सुरू झाले, महिलांना कुटुंबात मान मिळाला.

महिलांना लखपती बनवण्याचा आमचा मानस असून त्यासाठी तुम्हा सर्वांची साथ गरजेची असल्याचे यावेळी त्यांनी नमूद केले. लाडकी बहिण योजना कधीही बंद होणार नाही असे सांगताना त्यासाठी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत देखील महायुतीला अशीच साथ द्यावी अशी अपेक्षाही यावेळी त्यांनी व्यक्त केली.

गेल्या अडीच वर्षात राज्याचा वेगाने विकास झाला. अनेक लोककल्याणकारी योजना आम्ही मार्गी लावल्या. ठाणे शहरात वडाळा ते कासारवडवली दरम्यान मेट्रो मार्ग सुरू होत असून अंतर्गत मेट्रो मार्ग देखील तयार केला जाणार आहे. लवकरच त्याचे काम सुरू होणार असून त्याद्वारे हा सर्व भाग मेट्रोनी जोडला जाईल.

## दरीत बस कोसळली

### २ विद्यार्थ्यांचा मृत्यू, ५३ विद्यार्थी जखमी

■ महासागर प्रतिनिधी
नंदुरबार, दि. ९ :

जिल्ह्यातील देवगुई घाट परिसरात अनुदानित आश्रम शाळेच्या विद्यार्थ्यांना घेऊन जाणारी बस दरीत कोसळून भीषण अपघात झाला आहे. ही बस खोल दरीत कोसळल्याने दोन विद्यार्थ्यांचा मृत्यू तर ५३ विद्यार्थी जखमी झाले आहेत. बसमध्ये ३० पेक्षा अधिक विद्यार्थी असल्याचे सांगण्यात येते. हे विद्यार्थी जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव तालुक्यातील मेहुणबारे आश्रमशाळेचे असल्याची प्राथमिक माहिती आहे. घटनेनंतर स्थानिक नागरिकांकडून मदतकार्य सुरु करण्यात आले. प्रशासनाला अपघाताची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले.

अक्कलकुवा तालुक्यातील देवगुई घाटातील अमलीबारीजवळ हा अपघात झाला. बसमधील ३० पेक्षा अधिक विद्यार्थी जखमी झाले आहेत. ही शालेय बस जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव तालुक्यातील मेहूणबारे अनुदानीत आश्रमशाळेची असल्याची माहिती मिळत आहे. नंदुरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा आणि मोलगी या



गावांना देवगुई घाट जोडतो. दिवाळीच्या सुट्या लागल्या की आश्रमशाळेतील विद्यार्थी आपआपल्या गावांना परततात. सुट्या संपल्याने गावावर आलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांना आश्रमशाळेत नेण्यासाठी ही बस अक्कलकुव्याच्या मोलगी परिसरात आली होती. विद्यार्थ्यांना घेवून बस अक्कलकुवाकडे परतत असताना देवगुई घाटातील अमलीबारीजवळ वाहकाचे नियंत्रण सुटल्याने बस ८० ते शंभर फुट दरीत कोसळली. त्यावेळी बसमध्ये ३५ पेक्षा अधिक विद्यार्थी होते. यातील दोन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला.

## शिवभोजन थाळीसाठी सरकारचे २८ कोटींचे अनुदान

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ९ :

महाविकास आघाडीच्या काळात राबविण्यात आलेले महत्त्वाकांक्षी शिवभोजन योजना महायुती सरकारच्या काळात बारगळली. सहा महिन्यांपासून अनुदान वितरित न करण्यात आल्याने शिवभोजन थाळी चालकांकडून वारंवार आंदोलन करण्यात येत होते. या पार्श्वभूमीवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या तोंडावर सरकारकडून ७० कोटींच्या अनुदानापैकी २८ कोटींचे अनुदान वितरित करण्याचे आदेश अन्न व नागरी पुरवठा विभागाकडून देण्यात आले. महाविकास आघाडी सरकारच्या काळात शिवभोजन थाळी योजना सुरू करण्यात आली होती. अवघ्या १० रुपयांत दोन चपात्या, भाजी, वरण आणि भात असा आहार गरीब व गरजू जनतेसाठी उपलब्ध करून देण्यात आला होता. अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागाने जारी केलेल्या शासन निर्णयानुसार, या योजनेसाठी २०२५-२६ या आर्थिक वर्षात ७० कोटींची तरतूद असून त्यातील २८ कोटी रुपये तातडीने वितरीत करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. जिल्हा पुरवठा अधिकारी, शिधावाटप अधिकारी आणि उपनियंत्रक यांच्या माध्यमातून निधीचे वाटप करण्यात येणार आहे. शिवभोजन थाळी चालकांना दिलासा मिळाला असून पुन्हा ही केंद्रे चालू होण्याची शक्यता निर्माण झाली.

### काश्मीरमध्ये पाकिस्तानी नेटवर्कविरुद्ध कारवाई

## १२० ठिकाणी छापे टाकले

■ वृत्तसंस्था, श्रीनगर, दि. ९ :

काश्मीर खोऱ्यातील दहशतवादी नेटवर्क नष्ट करण्यासाठी सुरक्षा यंत्रणांनी शनिवारी एक मोठी मोहीम सुरू केली. जम्मू आणि काश्मीर पोलिस, काउंटर इंटेलिजेंस काश्मीर आणि राष्ट्रीय तपास संस्थेच्या (एनआयए) संयुक्त पथकांनी १२० हून अधिक ठिकाणी छापे टाकले. छाप्यांमध्ये मोबाईल फोन, सिम कार्ड, डिजिटल उपकरणे आणि इतर साहित्य जप्त करण्यात आले. तपास यंत्रणांच्या म्हणण्यानुसार, पाकव्याप्त काश्मीर (पीओके) मध्ये कैद असलेल्या दहशतवाद्यांचे नातेवाईक बडगाम, कुलगाम आणि शोपियांसारख्या दुर्गम भागातील त्यांच्या संपर्कात होते, त्यांच्यावर भारतात पाकिस्तानी प्रचार पसरवण्याचा आरोप आहे. गंदरबलमध्ये ६० हून अधिक घरांची झडती घेण्यात आली. ही घरे तुरुंगात असलेल्या दहशतवाद्यांची होती किंवा पाकिस्तानात सक्रिय असलेल्या दहशतवाद्यांच्या नातेवाईकांची होती. एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, "आमचे उद्दिष्ट दहशतवाद्यांशी असलेले संबंध तोडणे, प्रचार चॅनेल बंद करणे आणि निधीचे दुवे उघड करणे आहे."

### महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशन निवडणूक

## अध्यक्षपदी प्रवीण दरेकरांची बाजी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :

महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशनच्या निवडणुकीत भाजपचे नेते आणि विधानपरिषदेचे आमदार प्रवीण दरेकर यांनी मोठा विजय मिळवला आहे. प्रवीण दरेकर आणि जय कवळी पॅनेलचे सर्व २९ उमेदवार विजयी झाले असून, संपूर्ण कार्यकारिणीवर पूर्ण वर्चस्व प्रस्थापित केले आहे. या निवडणुकीकडे राज्यातील क्रीडा क्षेत्राचे विशेष लक्ष लागलेले होते.

महाराष्ट्र बॉक्सिंग संघटनेची वार्षिक निवडणूक आज, रविवार दिनांक ९ नोव्हेंबर २०२५ रोजी, धमार्दाय आयुक्त कार्यालय, वरळी (मुंबई) येथे पार पडली. या निवडणुकीसाठी सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत मतदानाची वेळ निश्चित करण्यात आली होती. धर्मादाय आयुक्त तसेच निवडणूक अधिकारी यांच्या देखरेखीखाली ही संपूर्ण प्रक्रिया पार पडली. या निवडणुकीत अध्यक्ष, १६ उपाध्यक्ष, महासचिव, खजिनदार, कार्यकारी सचिव, व्यवस्थापकीय सदस्य आणि विभागीय सचिव या महत्त्वाच्या पदांसाठी निवड प्रक्रिया घेण्यात आली.

अध्यक्षपदासाठी प्रवीण दरेकर आणि रणजीत सावरकर यांच्यात थेट लढत झाली. यामध्ये प्रवीण दरेकर यांनी बहुमताने विजय मिळवत बाजी मारली. महासचिव पदासाठी भरतकुमार व्हावळ आणि राकेश तिवारी यांच्यात चुरशीची लढत झाली, तर कार्यकारी सचिव पदासाठी शैलेश ठाकूर आणि सविता बावनथडे, प्रशासकीय सचिव पदासाठी महेश सकपाळ आणि नीलम पाटील यांच्यात निवडणूक झाली.

खजिनदार पदासाठी नाशिकचे ॲड. मनोज पिंगळे हे बिनविरोध निवडून आले आहेत. तसेच विभागीय सचिव पदासाठी आठ जागांपैकी सहा उमेदवार बिनविरोध विजयी झाले. त्यात नाशिकचे मयूर बोरसे, कोल्हापूरचे मंगेश कराळे, लातूरचे ॲड. संपत साळुंखे, छत्रपती संभाजीनगरचे अरुण भोसले, पुण्याचे विजयकुमार यादव, आणि अमरावतीचे विजय गोटे यांचा समावेश आहे.

आलेल्या नवीन कार्यकारिणीवर राज्यातील बॉक्सिंग खेळाचा विकास, प्रशिक्षण सुविधा, स्पर्धांचे नियोजन आणि जिल्हा ते आंतरराष्ट्रीय स्तरावरील सहभाग वाढवण्याची जबाबदारी असेल. क्रीडा क्षेत्रातील जाणकारांच्या मते, या निवडणुकीनंतर महाराष्ट्रात बॉक्सिंगच्या पायाभूत सुविधांचा विकास आणि युवा खेळाडूंसाठी अधिक संधी निर्माण होतील, अशी अपेक्षा आहे.



### उपाध्यक्ष पदासाठी चुरशीची लढत

उपाध्यक्ष पदासाठी एकूण २३ उमेदवार रिंगणात होते. त्यात पंकज भारसाखळे, मुन्ना कुरणे, मिलिंद साळुंके, तुषार रंधे, अविनाश बागवे, संग्राम गावंडे, गौतम चाबुकस्वार, गौरव चांडक, राजेश देसाई, शेख गफ्फार अकबर, वैभव वनकर, संतोष आंबेकर, विक्रांत खेडकर, नील पाटील, शाहुराज बिराजदार, अरुण बुटे, जयप्रकाश दुबळे, अमर भंडारवार, नीलम पाटील, गोपाल देवांग, राजाराम दळवी आणि विजय सोनावणे यांचा समावेश होता. या सर्व पदांवर दरेकर पॅनेलचे उमेदवार विजयी झाले आहेत.

# वाद्यांच्या फ्यूजनची नागपूरकरांवर संगीत मोहिनी

### खासदार सांस्कृतिक महोत्सवचा तिसरा दिवस ठरला मंत्रमुग्ध करणाऱ्या संगीतानुभवाचा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :

खासदार सांस्कृतिक महोत्सव-२०२५ च्या तिसऱ्या दिवशी बासरी, सतार, तबला, ड्रम्स आणि विविध वाद्यांच्या फ्यूजनने नागपूरकरांवर संगीत मोहिनी घातल्याचे दृश्य दिसून आले. सुप्रसिद्ध बासरी वादक रोणू मुजुमदार यांनी तयार केलेल्या राग हंसध्वनीमध्ये डांसिंग विथ द बीट च्या प्रस्तुतीने कार्यक्रमाची सुरुवात झाली आणि अक्षरशः संपूर्ण पटांगण परिसर फ्यूजन संगीतात न्हाऊन निघाला.

हनुमाननगरातील क्रीडा चौक येथील ईश्वर देशमुख शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या पटांगणावर ड्रम्स आर्टिस्ट गौतम शर्मा आणि नीलेश मोरे, सुप्रसिद्ध संगीतकार आणि जॅझ क्षेत्रात महारत असलेले अतुल रनिंगा, बेस गिटारवर हुकूमत असणारे प्रतिभावान संगीतकार मनीष कुलकर्णी, गायकी अंगाने सतार वाजविणारे स्वीकार कट्टी, लोकप्रिय संगीतकार मैसूर मंजुनाथ महादेवाप्पा, पद्मश्री आणि सुप्रसिद्ध बासरी वादक रोणू मुजुमदार यांनी कार्यक्रमाची संगीतमय सुरवात केली आणि त्यानंतर पॉप आणि रॉक प्रकारात तबल्यावर विशेष वर्चस्व असलेले बिक्रम घोष आणि अत्यंत प्रतिभावान आणि तालवाद्यांवर सरस असे तौफिक कुरेशी यांची त्यांना साथ लाभल्याने श्रोते-प्रेक्षक याना संगीताचा परमानंद मिळाला. भारत रत्न पंडित



रवीशंकर यांनी शिकविलेल्या राग कलावती मधील जनसंमोहिनी सम असलेले बॅक टु द रुट्स ने तर प्रेक्षकांना सांगीतिक आनंदाच्या परमोच्च शिखरावर नेले. त्यानंतर झपतालमधील राग बागेश्रीच्या प्रस्तुतीने वातावरण भारावून गेले. बिक्रम आणि तौफिक यांच्या रमता फ्यूजन ने सगळ्यांना चकित केले.

तत्पूर्वी, खासदार मध्ये वादन करण्यासाठी खास असावे लागते आणि आज आपण इथे संगीताचे जाणकार नितीन गडकरी यांना ही संधी दिल्याबद्दल आभार व्यक्त करतो, असे पद्मश्री आणि सुप्रसिद्ध बासरी वादक रोणू मुजुमदार यावेळी म्हणाले. खासदार सांस्कृतिक महोत्सवामुळे विदर्भातसंगीताचा प्रचार प्रसार झाल्याचे गौरव उद्गार त्यांनी काढले.

आजच्या कार्यकमाला केंद्रीय मंत्री व खासदार सांस्कृतिक महोत्सवाचे प्रणेते नितीन गडकरी, कांचन गडकरी, राज्याचे माहिती आयुक्त राहुल पांडे, नामवंत सर्जन डॉ. मुजफ्फर लकडावाला, डॉ. हर्षवर्धन मार्डीकर, डॉ. मंजूषा मार्डीकर, उद्योगपती अतुल गोयल, हॉटेल सयाजीचे अनिल नायर, हॉटेल अशोकाचे संजय गुप्ता, एलआयसीचे नीलेश साठे, उत्तरप्रदेशचे विधायक श्री विपिन वर्मा या सर्वांनी दीपप्रज्वलन करून पारंपरिक पद्धतीने सुरवात झाली. रिचा सुगंध आणि बाळ कुळकर्णी, रेणुका देशकर यांनी सूत्रसंचालन केले. महोत्सवाच्या यशस्वितेसाठी खासदार सांस्कृतिक महोत्सव आयोजन समितीचे अध्यक्ष प्रा. अनिल सोले, उपाध्यक्ष डॉ. गौरीशंकर पाराशर, अशोक मानकर, दिलीप जाधव, सचिव जयप्रकाश गुप्ता, कोषाध्यक्ष प्रा. राजेश बागडी, सदस्य बाळासाहेब कुलकर्णी, हाजी अब्दुल कदीर, सारंग गडकरी, अविनाश घुशे, डॉ. दीपक खिरवडकर, संदीप गवई, संजय गुळकरी, रेणुका देशकर, गुड्डू त्रिवेदी, किशोर पाटील, चेतन कायरकर, आशिष वांदिले, भोलानाथ सहारे, ॲड. नितीन तेलगोटे, मनिषा काशीकर, विजय फडणवीस, महेंद्र राऊत, दिलीप गौर, शैलेश ढोबळे यांचे सहकार्य लाभत आहे.

### स्थानिक जेम्स बॅडची दमदार प्रस्तुती

मुख्य कार्यक्रमाच्या आधी स्थानिक जेम्स बॅंडने उपस्थितांना मोहक गायन आणि वादनाने थिरकायला लावले. जेम्सबॅडचे प्रमुख गायक जेम्स इंगोले, गिटार आर्टिस्ट मोहित चौधरी, किबोर्ड आर्टिस्ट आयुष बंगारिया, ड्रम्स आर्टिस्ट कुणाल शेंडे आणि बास आर्टिस्ट जोसेफ न्यूटन या सर्वांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# दिव्यांग प्रवाशांना मेट्रो प्रवासात संपूर्ण सवलत द्या

## पत्रकार दीपक कैतके यांची मागणी



**मुंबई :** राज्यातील एसटी महामंडळात महिला प्रवाशांना प्रवास भाड्यात ५० टक्के सवलत देण्यात आली आहे आणि उर्वरित ५० टक्के रक्कम शासनाकडून एसटी महामंडळाला परतावा स्वरूपात दिली जाते. या धर्तीवरच दिव्यांग प्रवाशांसाठीही मेट्रो प्रवासात अशाच प्रकारची सवलत द्यावी, अशी मागणी ज्येष्ठ पत्रकार आणि पत्रकार रुग्णमित्र म्हणून ओळखले जाणारे दीपक कैतके यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच मुंबई मेट्रो प्रशासनाकडे केली आहे. कैतके यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे की, मेट्रो स्थानकांमध्ये व गाड्यांमध्ये दिव्यांग अनुकूल सुविधा अद्याप पूर्णपणे उपलब्ध नाहीत. त्यामुळे अनेक दिव्यांग प्रवाशांना प्रवास करताना सहकारी व्यक्तीची मदत घ्यावी लागते. या अतिरिक्त अडचणींचा विचार करता, दिव्यांग बांधवांना मेट्रो प्रवासात संपूर्ण सवलत देणे हे केवळ सामाजिक न्यायाचे नव्हे, तर मानवी दायित्वाचे पाऊल ठरेल. त्यांनी पुढे नमूद केले आहे की, राज्य शासनाने महिला प्रवाशांसाठी केलेल्या निर्णयाप्रमाणेच दिव्यांग प्रवाशांसाठीही शासनाने परतावा स्वरूपात मेट्रो प्रशासनाला आर्थिक मदत देऊन ही सवलत शक्य आहे. दिव्यांगांना दिली जाणारी सवलत ही त्यांच्या शारीरिक मयार्देची जाणीव ठेवून सन्मानपूर्वक दिलेली मदत ठरावी, अशी अपेक्षा कैतके यांनी व्यक्त केली आहे. दिव्यांग व्यक्तींना प्रवासात सुलभता व सन्मान मिळावा, यासाठी दीपक कैतके यांनी सातत्याने शासनस्तरावर पाठपुरावा सुरू ठेवला आहे.

# पार्थ पवारांच्या अमेडिया कंपनीचा आणखी एक घोटाळा

## २२ दस्त नोंदणीची चौकशी : मंत्री पाटील

**■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ९ :**

पार्थ पवारांनी घेतलेल्या जागेचीच नाही तर पुण्यातील अन्य २२ जमिनींच्या व्यवहारांच्या फायलींची तपासणी सुरू असून स्टॅम्प खरेदीही उघड होईल, असे मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितल्याने पुण्यातील जमिनीचे मोठे घोटाळे समोर येण्याची चिन्हे आहेत. पार्थ पवारांच्या कंपनीला विकलेल्या जागेबरोबरच पुण्यातील बोपोडी येथील शासकीय दूध डेअरीची जागा खासगी व्यक्तीच्या नावे करण्याच्या प्रकरणाचाही त्यात समावेश आहे. नोंदणी व मुद्रांक विभाग कार्यालयातील सहायकाच्या समितीकडून २२ भूखंडांवरील व्यवहाराची कसून तपासणी सुरू झाली आहे. पार्थ पवारांसंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस माहिती घेऊन निर्णय घेतील, चुकीचे असेल तर ते कुणालाही माफ करणार नाहीत, असेही ते म्हणाले.

ज्या जागेवर शासनाचे नाव आहे, ती जागा खरेदी करण्याचा प्रयत्न पार्थ पवारांकडून झाला, तो बेकायदेशीर ठरला आहे. त्यापूर्वी जैन ट्रस्टच्या होस्टेलच्या जागेच्या विक्रीचा व्यवहार प्रचंड दबाव आल्यानंतर रद्द झाला. आता बोपोडीतील दूध डेअरीची शासकीय जागा खासगी मालकाच्या घशात घालण्याप्रकरणी पोलिसांत गुन्हा नोंदला गेला आहे. बोपोडी परिसरातील कृषी खात्याची नोंद असलेल्या ५ हेक्टर ३५ आर जमिनीवर शासकीय दूध डेअरी होती. ही जागा व्हिजन प्रॉपर्टी कंपनीच्या माध्यमातून ज्यांचे मालकी हक्क दाखवले गेले, त्यात शीतल तेजवाणी व दिग्विजय पाटील यांचीही नावे आहेत. ही नावे पार्थ पवारांच्या जमीन प्रकरणातही आहेत. याच प्रकरणात पुणे शहराचे तहसीलदार येवले यांना निलंबित करण्यात आले आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी चौकशी करून येवले यांच्याविरोधात कारवाईची शिफारस केली होती, अशी माहिती आता समोर आली आहे. मिस फरहा चॅरिटेबल फाउंडेशनने याच्या चौकशीची मागणी केली आहे.



माझे नाव अमेडिया या कंपनीसोबत व्यवहार केल्याचे चुकीच्या पद्धतीने प्रसिद्ध करण्यात आले आहे.

मी कधीही पार्थ पवार, दिग्विजय अमरसिंह पाटील किंवा त्यांच्या भागीदारांना भेटलो नाही. तसेच अमेडिया कंपनी किंवा त्या कंपनीचे कोणतेही भागीदार, तसेच शीतल तेजवाणी यांच्याशी माझा कोणताही आर्थिक व्यवहार झालेला नाही. माध्यमामध्ये माझे नाव या कंपनीशी माझा कोणताही संबंध नसताना जोडले गेले आहे. माझ्यावर दाखल झालेला गुन्हा गैरसमजुतीतून झाला असून मी चौकशी यंत्रणेला पूर्ण सहकार्य करत आहे, असे हेमंत गावंडे यांनी सांगितले आहे.

# बीड नगर परिषदेच्या छतावर कर्मचाऱ्याची आत्महत्या

**■ महासागर प्रतिनिधी, छत्रपती संभाजीनगर, दि. ९ :**

बीड नगर परिषदेच्या वसुली विभागात कार्यरत असलेले अविनाश धांडे ७ नोव्हेंबर रोजी रात्री कार्यालयाच्या छतावरच गळफास घेऊन आत्महत्या केल्याच्या अवस्थेत आढळून आले. ८ नोव्हेंबर रोजी सकाळी ही घटना समोर आली. आत्महत्या करणारे अविनाश धांडे यांनी एक नोंद मोबाईल फोनमध्ये केलेली असून त्यामध्ये चार अधिकाऱ्यांची नावे लिहून वेळोवेळी पदोन्नतीपासून डावलल्यासह अनेक आरोप केलेले आहेत. शिवाय मुख्याधिकारी शैलेश फडसे यांना कुटुंबाविषयी एक भावनिक पोस्टही लिहिलेली आहे.

या घटनेमुळे बीड शहरात खळबळ उडाली असून पोलीस काय भूमिका घेतात आणि याप्रकरणी तक्रार काय पुढे येते याकडे लक्ष लागले आहे. वसुली विभागात कार्यरत असलेले अविनाश धांडे यांचा शुक्रवारचा घटनाक्रम समोर आला असून, दिवसभर कार्यालयाच्या परिसरातच बसलेले होते. सायंकाळच्या सुमारास त्यांनी एका झेरॉक्स दुकानात बसून चहाही घेतला. या दरम्यान धांडे हे तणावातच असल्याची माहिती समोर आली.

रात्री धांडे हे घरी परतले नाहीत. त्यांच्या शोधात नातेवाईक फिरत होते. विविध ठिकाणी शोध घेऊनही धांडे सापडले नाहीत. अखेर शेवटी छतावर गेल्यानंतर अविनाश धांडे हे गळफास घेतलेल्या अवस्थेत मिळून आले. या प्रकरणाची माहिती शहर पोलिसांना देण्यात आली त्यानंतर पंचनामा आणि मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा रुग्णालयात पाठवणे या प्रक्रिया करण्यात आल्या.

अविनाश धांडे यांनी तत्कालीन एका मुख्याधिकाऱ्यासह वसुली विभागातील अन्य दोन अधिकारी व अन्य एका बड्या अधिकाऱ्यावर अनुभव नसलेल्या कर्मचाऱ्यास पदोन्नती देऊन ज्येष्ठता न पाहता त्यांना डावलणे, शासकीय अहवालावर कमी गुण देणे तर एका अधिकाऱ्याने वागणुकीचा गैरफायदा घेणे, आदी गंभीर आरोप केले आहेत. याप्रकरणाविषयी बीड शहर पोलिसांनी सांगितले की, रविवारी सकाळपर्यंत कुठलीही तक्रार पुढे आली नसल्याने अद्याप नवी काही माहिती नाही.

# बदलापुरात भाजपच्या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती

**बदलापूर :** निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांची ठाणे जिल्हा ग्रामीण निवडणूक प्रमुख पदी निवड करण्यात आली आहे. त्यानंतर कपिल पाटील यांनी बदलापूरमधील भाजपच्या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेऊन त्यांच्याशी संवाद साधला आहे. यापूर्वी भाजपच्या वतीने गेल्या दोन-तीन आठवड्यापासून संभाव्य उमेदवारांसाठी जोरदार प्रचार मोहीम सुरू आहे. शनिवारी बदलापूरमध्ये भाजपचे माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांनी भाजपच्या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या. कुळगाव बदलापूर नगरपरिषदेची २ डिसेंबर रोजी निवडणूक होणार आहे. १० नोव्हेंबर पासून उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होईल. तत्पूर्वी भाजपमधील इच्छुक उमेदवारांची चाचणी घेण्यासाठी मुलाखती घेण्यात आल्या. त्यामध्ये ८० हुन अधिक इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या आहेत. त्यांच्याशी संवाद साधत असताना या संवादात भाजपचे इच्छुक उमेदवार शिवसेनेसोबत युती करण्यास सकारात्मक असल्याचे बोलले जात आहे. दरम्यान, वरिष्ठ वरिष्ठ पातळीवर पक्षांकडून आदेश पाहता आणि दोन्ही पक्षांकडून प्रत्येक प्रभागात इच्छुक उमेदवारांकडून जोरदार प्रचार मोहीम सुरू असताना युती बाबत शेवटी काय निर्णय होतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# सिडको घोटाळ्यावर सरकारचे मौन

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :**

राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जवळच्या व्यक्तीवर कारवाई होत नाही. पण ज्यांचा राजकीय गेम करायचा आहे त्याच्यावर मात्र कारवाई होते. सरकारच्या एका विभागाने सांगून सुद्धा मी समोर आणलेल्या सिडको घोटाळ्याप्रकरणी कारवाई झाली नाही, पण पार्थ पवार यांच्या प्रकरणी सुपरफास्ट कारवाई केली जात आहे, असा भेदभाव न करता कारवाई करण्यात यावी असे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी म्हटले आहे.

रोहित पवार म्हणाले की, एकनाथ शिंदे यांची गरज भाजपच्या सर्व नेत्यांना मुंबईच्या निवडणुकीसाठी आहे. मुंबईची निवडणूक संपली की एकनाथ शिंदे यांना टार्गेट केले जाईल. त्यांना पूर्णपणे



रोहित पवारांचा घणाघात

राजकीयदृष्ट्या संपवण्याचा प्रयत्न केला जाईल. त्यांच्या ठाण्यामध्ये सुद्धा त्यांना नीट राजकारण करू दिले जाणार नाही. जो व्यक्ती चुकीचा आहे त्याच्यावर कारवाई झाली पाहिजे. सिडकोचे प्रकरण असो की नवी मुंबईमधील खडीचे प्रकरण असो की नाशिकमधील जमिनीचे प्रकरण, शिरसाट यांच्या एमआयडीसीचा मुद्दा असे अनेक मुद्दे आहेत. ज्या काही सरकारी जमिनी आहेत किंवा कुळाच्या जमिनी आहेत कुणाच्याच नावाने होत नाही त्यावर ज्यांनी ज्यांनी ताबा घेतला आहे किंवा त्यावर घातले आहे अशा सर्वांवर कारवाई करण्यात यावी.

रोहित पवार म्हणाले की, मुख्यमंत्री तुम्ही लोकांवर लक्ष ठेवून आहात पण मुंबईमध्ये जिथे भाजपचे कार्यालयाबाबत स्पष्टीकरण दिले पाहिजे. सरकारी कुठलीही जमीन कोणत्याही पक्षाला देता येत नाही ते देऊ नये अशी आमची भूमिका आहे. भाजपला आता कुबड्यांची गरज संपलेली आहे. अमित शहा यांनी इथे येत सांगितले आहे की कुबड्यांची गरज नाही म्हणून त्या तोडण्याचा प्रयत्न सुरू आहे. फडणवीस मुख्यमंत्री झाल्यापासून मोठ्या प्रमाणात जमीन घोटाळे झाले आहेत.

# मनोज जरांगे पाटील यांना मुंबई पोलिसांचे समन्स

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :**

सप्टेंबर महिन्यात मराठा आंदोलकांनी आझाद मैदानात विनापरवागनी आंदोलन केल्याप्रकरणी पोलिसांनी आयोजकांविरोधात कारवाई सुरू केली आहे. मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्यासह ६ आयोजकांना सोमवार १० नोव्हेंबर आझाद मैदान पोलीस ठाण्यात चौकशीसाठी हजर राहण्यासाठी नोटीस बजावण्यात आली आहे. आयोजकांविरोधात सप्टेंबर महिन्यात विनापरवनगी आंदोलन करून जमावबंदी कायद्याचे उल्लंघन केल्याप्रकरणी आझाद मैदान पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल दाखल करण्यात आला होता. त्या गुन्ह्याच्या अनुषंगाने ही चौकशी केली जाणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

२९ ऑगस्ट ते २ सप्टेंबर या काळात मराठा समाजाच्या आरक्षणासाठी मनोज जरांगे-पाटील यांच्या नेतृत्वाखाली मुंबईत आंदोलन



करण्यात आले होते. आझाद मैदानात जरांगे-पाटील यांनी आमरण उपोषण सुरू केले होते यावेळी हजारो कार्यकर्ते मुंबईत जमा झाले होते. या आंदोलनाला पोलिसांनी परवानगी नाकारली होती तसेच परिसरात जमावबंदी लागू करण्यात आली होती. मात्र आंदोलकांनी जमावबंदीच्या आदेशाचे उल्लंघन केले होते. घोषणाबाजी करत रस्ते अडवून वाहतूक रोखून धरली होती. त्यामुळे मनोज जरांगे पाटील यांच्यासह आयोजकांविरोधात ३ सप्टेंबर २०२५ रोजी आझाद मैदानात कलम १८९ (२), १८९(३), १९०, २२३ (१), २२३ (२), १२६(२) २७१ आणि २७१ अन्वये तसचे महाराष्ट्र पोलीस कायद्याच्या कल म ३७(३), ३८, १३५, १३६ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले होते.

या गुह्याच्या अनुषंगाने चौकशी करण्यासाठी मनोज जरांगे-पाटील यांच्यासह ६ प्रमुख आयोजकांना आझाद मैदान पोलिसांनी समन्स बजावले आहे. सोमवार १० नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजत आझाद मैदानात हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहे. मनोज जरांगे पाटील, (अंतरवाली सराटी, जालना) सिताराम कलकुठ्ठे, (बीड) विरेंद्र पवार, मराठी आरक्षण आंदोलन समनव्य, (दादर) पांडुरंग तारक (जालना) प्रशांत सावंत (मुंबई) चंद्रकांत भोसले (मुंबई) आंदीचा समावेश आहे. पोलीस निरीक्षक (कायदा आणि सुव्यवस्था) ज्ञानेश्वर आव्हाड यांनी कलम ३५ (३) अन्वये ही नोटीस कढली आहे.

# मातोश्री ड्रोन प्रकरणावरून आदित्य ठाकरेंचा संतप्त सवाल



**मुंबई :** बीकेसी सर्व्हेच्या नावाखाली आमच्या घरावर नजर ठेवली जात आहे का? असा संतप्त सवाल शिवसेना ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी उपस्थित केला आहे. मातोश्रीच्या परिसरात ड्रोन फिरताना दिसल्यानंतर आदित्य ठाकरेंनी संताप व्यक्त करत महायुती सरकारवर टीका केली आहे. कोणता सर्व्हे एखाद्याच्या घरात डोकावण्याची आणि दिसताच लगेच पळून जाण्याची परवानगी देतो? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे. आदित्य ठाकरे यांनी ट्विट करत काही प्रश्न एमएमआरडीएला तसेच सरकारला उद्देशून केले आहेत. रहिवाशांना का माहिती देण्यात आली नाही? एमएमआरडीए फक्त संपूर्ण बीकेसीसाठी आमच्या घराची देखरेख करत आहे का? एमएमआरडीएने जमिनीवर उतरून त्यांच्या कामाच्या बनावटीवर लक्ष केंद्रित करावे, जसे की एमटीएचएल (अटल सेतू) जे त्यांच्या भ्रष्टाचाराचे उदाहरण आहे. तसेच जर पोलिसांनी परवानगी दिली असेल तर रहिवाशांना का माहिती देण्यात आली नाही? असे प्रश्न आदित्य ठाकरे यांनी उपस्थित केले आहेत.

# कात्रज बोगद्याजवळ भीषण अपघात

## दुचाकीस्वाराचा मृत्यू

**■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ९ :**

नवीन कात्रज बोगद्याजवळ दोन दुचाकींच्या भीषण अपघातात एका दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला आहे. भरधाव वेगात आलेल्या दुसऱ्या दुचाकीने धडक दिल्याने हा अपघात घडला. याप्रकरणी आंबेगाव पोलिसांनी संबंधित दुचाकीस्वाराविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. दीपक जगन्नाथ हिरगुडे (वय २५, रा. गणेश चौक, आंबेगाव पठार, धनकवडी) असे मृत्युमुखी पडलेल्या तरुणाचे नाव आहे. ओंकार कैलास कदम (वय २४, रा. कात्रज) यांनी याप्रकरणी आंबेगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

फियार्दीनुसार, तक्रारदार ओंकार कदम यांचा मित्र दीपक हिरगुडे मध्यरात्री मुंबई-बंगळुरू बाह्यवळण मार्गावरून दुचाकीने जात होता. नवीन कात्रज बोगद्याजवळ पाठीमागून भरधाव वेगात आलेल्या एका दुचाकीस्वाराने त्याच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात दीपक गंभीर जखमी झाला. त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. सहायक पोलीस निरीक्षक फिरोज मुलाणी या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. दरम्यान, स्वारगेट एसटी स्थानकाच्या आवारात बसच्या धडकेत एक प्रवासी जखमी झाल्याची दुसरी घटना घडली आहे. याप्रकरणी एसटी बस चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिवाजी बापूराव कानडे (वय ५२, रा. बारवनगर, ता. बारामती, जि. पुणे) असे जखमी झालेल्या प्रवाशाचे नाव आहे. कानडे यांनी स्वतः स्वारगेट पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

# दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षकांसाठी लायन्स क्लबचा मेळावा

**■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ९ :**

लायन्स क्लबतर्फे 'हाक दिव्यांगांची, साथ लायन्स'ची या उपक्रमांतर्गत दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षकांसाठी विशेष आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. टिळक रस्त्यावरील न्यू इंग्लिश स्कूलमधील गणेश सभागृहात हा मेळावा पार पडला. यावेळी प्रसिद्ध वक्ते आणि लायन्स क्लबचे माजी प्रांतपाल द्वारका जालान यांनी 'चलती रहे जिंदगी' या विषयावर मार्गदर्शन केले, तर भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश प्रवक्ते संदीप खर्डेकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

द्वारका जालान यांनी आपल्या भाषणात जीवनात कधीही निराश न होण्याचा सल्ला दिला. प्रत्येक समस्येला उत्तर असते आणि त्यासाठी आपल्या आहारात सत्त्व, जगण्यात तत्त्व आणि बोलण्यात ममत्व या त्रिसूत्रीचा अवलंब करावा, असे ते म्हणाले. जीवनातील कुठल्याही समस्येचा सामना करताना 'गिव्ह अप' न करता सातत्याने पाठपुरावा केल्यास मार्ग सापडतो, यावर विश्वास ठेवण्याचे आवाहन त्यांनी केले. जालान यांनी नर्मविनोदी शैलीत श्रोत्यांना खिळवून ठेवले. मोबाईलच्या अतिवापरामुळे आपले जगणे निष्क्रीय झाले आहे, असे सांगून ते म्हणाले की, जीवन रोज नव्याने मिळते आणि मृत्यू एकदाच येतो, हे लक्षात ठेवून जीवनाचा आनंद घ्यायला शिकले पाहिजे.

# महाराष्ट्रात थंडीची चाहूल

**■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ९ :**

महाराष्ट्रात पावसाळा संपून आता थंडीची चाहूल लागली आहे. मध्य व मराठवाडा तसेच विदर्भात गेल्या दोन ते तीन दिवसांत किमान तापमानात 3 ते 4 अंश सेल्सिअसने घट नोंदवली गेली आहे. प्रादेशिक हवामान केंद्राच्या माहितीनुसार, छत्रपती संभाजी नगरमध्ये 12.8 अंश, तर बीडमध्ये 11.8 अंश सेल्सिअस इतके तापमान नोंदवले गेले. राज्यातील सर्वाधिक तापमान घट जळगाव जिल्ह्यात झाली असून, गेल्या २४ तासांत तापमान तब्बल पाच अंशांनी घसरले आहे. आज सकाळी जळगावचे किमान तापमान 10.5 अंश सेल्सिअस इतके होते. हवामान खात्याच्या अंदाजानुसार, पर्वतीय प्रदेशात होणाऱ्या बर्फवृष्टीमुळे वायव्य आणि लगतच्या मध्य भारतावर कोरडे व थंड वारे वाहत आहेत. पुढील सहा ते सात दिवसांत वायव्य आणि लगतच्या मध्य भारतात रात्रीचे तापमान सामान्य तापमानाच्या तुलनेत 2 ते 5 अंश सेल्सिअसने कमी राहण्याची शक्यता आहे. राजस्थानसह काही भागांत थंडी चांगलीच वाढली आहे.

# अनियंत्रित कार उलटली



**■ महासागर प्रतिनिधी दर्यापूर, दि. ९ :**

दर्यापूर ते अकोला मार्गावरील लासूर फाट्यानजीक कारचा अपघात होऊन पाच जण जखमी झाले. ही घटना शनिवारी (दि. ८) सकाळी साडेनऊ वाजता घडली आहे. घटनेची माहिती मिळताच अपघातस्थळी मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती. अपघातामुळे काही वेळ वाहतूक विस्कळीत झाली होती. कारचालकाचे नियंत्रण सुटल्यामुळे हा अपघात झाल्याचे काही प्रत्यक्षदर्शी सांगत होते.

या अपघातात वैभव ढोके (३०), अमोल बाबुराव चौधरी (३२), शेख सलीम शेख नासिर (२६ ), अरशिद खान फिरोज खान (२४, सर्व रा. अमरावती) हे चौघे गंभीर जखमी झाले तर अन्य एकजण किरकोळ जखमी आहे. घटनेतील जखमी अमरावतीच्या एका कार शोरूममधील कर्मचारी आहेत. ते अकोला येथे कंपनीच्या कामानिमित्त कारने जात होते. दरम्यान दर्यापूर तालुक्यातील लासूर फाट्याजवळ कार चालकाचे नियंत्रण सुटले व कार रस्त्याच्या कडेला जाऊन पलटी झाली. घटनेनंतर जखमींना खासगी रुग्णवाहिकेतून दर्यापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले.

# भाजपचा इन्कमिंग प्लॅन फेल

## महेश गायकवाड यांची शिवसेनेत घरवापसी

**■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ९ :**

कल्याण पूर्वच्या राजकारणात एक मोठा आणि अनपेक्षित राजकीय ट्विस्ट घडला आहे. भाजपमध्ये प्रवेशासाठी सर्व तयारी पूर्ण झालेली असतानाच, माजी शिवसेना (शिंदे गट) नेते महेश गायकवाड यांनी ऐनवेळी यू-टर्न घेत पुन्हा शिवसेना शिंदे गटात घरवापसी केली आहे. या घडामोडीमागे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार श्रीकांत शिंदे यांच्या मध्यरात्री झालेल्या चर्चांचा मोठा वाटा असल्याचे सूत्रांकडून समजते. इतकेच नव्हे, तर गायकवाड यांना कल्याण पूर्व आणि उल्हासनगर विधानसभा मतदारसंघांचे संपर्कप्रमुख म्हणून जबाबदारीही सोपवण्यात आली आहे. या नियुक्तीमुळे गायकवाड यांचे राजकीय वजन पुन्हा वाढले आहे.



गायकवाड यांचा शिंदे गटातून बाहेर पडण्याचा निर्णय गणपत गायकवाड गोळीबार प्रकरणानंतर झाला होता. त्या घटनेनंतर त्यांनी महायुतीच्या अधिकृत उमेदवार सुलभा गायकवाड यांच्या विरोधात बंडखोरी करत स्वतंत्र उमेदवारी अर्ज दाखल केला होता. त्यामुळे शिंदे गटाने त्यांची तात्काळ हकालपट्टी केली होती. हकालपट्टीनंतर गायकवाड यांनी आपल्या राजकीय अस्तित्वासाठी नवा मार्ग शोधण्यास सुरुवात केली आणि त्यांचा संपर्क भाजप नेते रवींद्र चव्हाण तसेच स्थानिक नेतृत्वाशी वाढला.

भाजप प्रवेशाची तयारी अंतिम टप्प्यात पोहोचली होती, मात्र शिंदे गटासाठी हा डॅमेज ठरण्याची शक्यता लक्षात घेऊन पक्ष नेतृत्वाने तातडीने हस्तक्षेप केला.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार श्रीकांत शिंदे यांनी मध्यरात्री महेश गायकवाड यांच्याशी संपर्क साधून मनधरणी केली. केवळ घरवापसी नव्हे, तर संघटनेतील महत्त्वाचे पद देण्याचे आश्वासन देण्यात आले. अखेर, गायकवाड यांनी भाजप प्रवेशाचा निर्णय मागे घेत पुन्हा एकदा शिंदे गटात परतण्याचा निर्णय घेतला.

# होंडा शोरुमला आग

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :**

अंधेरी येथील चांदिवली फार्म मार्गावरील कमानी ऑईल गेटमागच्या होंडा शोरुमला शनिवारी मध्यरात्री १.३० च्या सुमारास अचानक आग लागली. या आगीत शोरुमचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. मात्र, सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या जवानांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत मदतकार्य हाती घेतले. अग्निशमन दलाचा ताफा घटनास्थळी पोहोचेपर्यंत आगीने अक्राळविक्राळ रूप धारण केले होते.

# चंद्रकांत पाटलांनी घेतले कुस्तीपटू सनी फुलमाळीचे पालकत्व

**■ महासागर प्रतिनिधी पुणे, दि. ९ :**

घरची परिस्थिती बिकट असूनही जिद्द,चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या बळावर बहरिन येथे झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत सनी फुलमाळीने भारतासाठी सुवर्णपदक कमवले. यामुळे त्याचं आयुष्यच पालटलं आहे. लोहगावमधील पालावर राहून कुस्तीमध्ये सुवर्ण कामगिरी करणाऱ्या सनीचे पालकत्व राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी घेतले. लोकसहभागातून घर आणि सरावासाठी तालीम, शिक्षणासाठी सर्वतोपरी मदत आणि स्वतःच्या पगारातून दरमहा ५० हजार रुपये



देण्याची घोषणा पाटील यांनी केली.

सनी आणि त्याच्या कुटुंबाची लोहगावमधील पालावर जाऊन चंद्रकांत पाटील यांनी भेट घेतली आणि अभिनंदन करुन त्याच्या कामगिरीचे कौतुक केले. यावेळी सनीचे प्रशिक्षक वस्ताद सदाशिव राखपसरे, भाजपा क्रीडा आघाडीचे प्रदेशाध्यक्ष संदीप भोंडवे, माजी नगरसेवक बॉबी टिंगरे यांच्यासह परिसरातील नागरिक उपस्थित होते. चंद्रकांत पाटील म्हणाले, जिद्द, चिकाटी आणि कठोर मेहनतीच्या बळावर सनीने मिळवलेले यश हे अतिशय कौतुकास्पद आहे. त्याने आपल्या कामगिरीने आई वडिलांचं नाव काढलं आहे. डोक्यावर छप्पर नसतानाही पालावर राहून त्याने ही कामगिरी केली. सनीला लोकसहभागातून घर आणि कुस्तीच्या सरावासाठी तालीम बांधून देणार आहे. त्यासोबतच शिक्षणासाठीही सर्वतोपरी मदत करणार असून, माझ्या आणि पत्नीच्या उत्पन्नातून उदरनिर्वाहासाठी दरमहा ५० हजार रुपये देणार असल्याचं त्यांनी सांगितले.

शिक्षण पूर्ण करण्यासोबतच सनी याने कुस्तीकडेदेखील लक्ष केंद्रित करावे. ऑलिम्पिकमध्येही सुवर्ण कामगिरी करावी, तसेच आंतरराष्ट्रीय किंवा राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धेत चमकदार कामगिरी करुन पदक मिळवणाऱ्या खेळाडूंना शासकीय सेवेत सामावून घेण्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या काळात यापूर्वीच निर्णय झालेला असून, राज्यभरातील असंख्य खेळाडूंना त्याचा लाभ झालेला आहे. मात्र सदर निर्णय हा १७ वर्षांवरील खेळाडूंना लागू आहे. त्यामुळे सनीच्या निमित्ताने १७ वर्षांखालील खेळाडूंनाही प्रोत्साहन मिळावे यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा करणार असल्याचे पाटील यांनी सांगितले.

# लिफ्टच्या बहाण्याने वृद्ध महिलेला 8 हजारांने लुटले!

**वासेवाडी फाट्यावर घटना**

**अमरावती** - भातकुली पोलिस ठाण्याच्या हद्दीतील वासेवाडी फाटा येथे एका वृद्ध महिलेला लिफ्ट देण्याच्या बहाण्याने फसवून तिच्याकडील 8 हजार रुपये रोख रक्कम लुटल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी ज्ञानूबाई सुदाम तायडे (वय 65, रा. मलकापूर, भातकुली) यांनी फिर्याद दिली असून पोलिसांनी अज्ञात दुचाकीस्वाराविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे.


मिळालेल्या माहितीनुसार, ज्ञानूबाई तायडे या शेतीमजुरीचे काम करतात. 8 नोव्हेंबर रोजी दुपारी त्या गणोजादेवी येथे नातलगांच्या घरी गेल्या होत्या. तेथून परत मलकापूरला जाण्यासाठी त्या भातकुली येथे आल्या व एस.टी. बसची वाट पाहत होत्या. त्याच वेळी एक अज्ञात युवक दुचाकीवर तेथे आला. त्याने बोलण्यात गुंतवून मी तुम्हाला मलकापूरपर्यंत सोडतो, असे सांगून ज्ञानूबाईंना दुचाकीवर बसवले. वासेवाडी फाट्याजवळ पोहोचल्यावर त्या युवकाने अचानक ज्ञानूबाईंच्या हातातील पैशांचे पाकीट हिसकावून घेतले. त्यातून 8 हजार रुपये रोख रक्कम काढून पाकीट परत त्यांच्या अंगावर फेकले व दुचाकीसह फरार झाला. घटनेनंतर संतप्त झालेल्या ज्ञानूबाईंनी तत्काळ भातकुली पोलिस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. पोलिसांनी अज्ञात दुचाकीस्वाराविरुद्ध लूट व फसवणुकीचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# नगर परिषद निवडणुकांसाठी आजपासून नामनिर्देशन प्रक्रिया

## 17 नोव्हेंबरपर्यंत अर्ज दाखल करण्याची मुदत

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 9)** - राज्य निवडणूक आयोगाने जिल्ह्यातील नगर परिषद निवडणुकांच्या कार्यक्रमाची घोषणा केली असून नामनिर्देशनपत्र भरण्याची प्रक्रिया सोमवारपासून (दि. 10 नोव्हेंबर) सुरू होत आहे. ही प्रक्रिया 17 नोव्हेंबर 2025 पर्यंत सुरू राहणार आहे. उमेदवारांना आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळावरून ऑनलाईन नामनिर्देशनपत्र भरता येणार असून ही सुविधा 17 नोव्हेंबर रोजी दुपारी 2 वाजेपर्यंत उपलब्ध राहील.




सुट्टीचा दिवस वगळता उमेदवारांना प्रत्यक्ष नामनिर्देशन दाखल करण्यासाठी सकाळी 11 ते दुपारी 3 वाजेपर्यंत वेळ निश्चित करण्यात आली आहे. निवडणूक आयोगाने सर्व उमेदवारांना वेळेत व नियमांनुसार अर्ज सादर करण्याचे आवाहन केले आहे.

**दुपारी दोन पर्यंत ऑनलाईन अर्ज**

10 ते 17 नोव्हेंबर 2025 दुपारी 2 वाजेपर्यंत दिलेल्या संकेतस्थळावर अर्ज भरता येईल. तसेच सुटीचा दिवस वगळता सकाळी 11 ते दुपारी 3 नामनिर्देशन दाखल करता येईल.

**या ठिकाणी दाखल करता येईल नामनिर्देशन**

| नगर परिषद | अर्ज दाखल करण्याचे ठिकाण |
|---|---|
| अचलपूर | नगर परिषद अचलपूर, सभागृह (कॅम्प) |
| अंजनगाव सुर्जी | नगर परिषद कार्यालय |
| वरुड | नगर परिषद कार्यालय |
| दर्यापूर | नगर परिषद कार्यालय |
| मोर्शी | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे दालन |
| चिखलदरा | प्रशासक सभागृह, नगर परिषद |
| शेंदुरजना घाट | नगर परिषद कार्यालय |
| चांदूर रेल्वे | नगर परिषद कार्यालय |
| चांदूर बाजार | नगर परिषद कार्यालय |
| धामणगाव रेल्वे | तहसील कार्यालय सभागृह |
| धारणी | उपविभागीय अधिकारी कार्यालय |
| नांदगाव खंडेश्वर | तहसील कार्यालय |

# शेगाव दर्शनाला गेलेले कुटूंबाच्या घरी चोरी

## 44 ग्रॅम सोनं व 60 हजार रोख केली लंपास!



महासागर | प्रतिनिधी

**सुरवाडी खुर्द येथील घटना**

**तिवसा, (दि.9)** - गजानन महाराजांच्या दर्शनासाठी कुटुंबासह शेगावला गेलेल्या एका कुटुंबाच्या अनुपस्थितीत चोरट्यांनी घरफोडी करून 44 ग्रॅम सोन्याचे दागिने व 60 हजार रुपये रोख रक्कम असा एकूण लाखोंचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना सुरवाडी खुर्द (ता. तिवसा) येथे घडली आहे. ही घटना शनिवार, 8 नोव्हेंबरच्या सायंकाळी उघडकीस आली.

मिळालेल्या माहितीनुसार, अतुल रामभाऊ राऊत हे आपल्या पत्नी, दोन मुलं व सासू यांच्यासह 6 नोव्हेंबर रोजी शेगावला दर्शनासाठी गेले होते. दोन दिवसांनी म्हणजेच 8 नोव्हेंबर रोजी परतल्यानंतर त्यांनी पाहिले असता घराचे कुलूप तुटलेले होते. घरात प्रवेश केल्यावर बेडरूममधील सोफा, फर्निचर व गादी अस्ताव्यस्त अवस्थेत पडलेले दिसले. लोखंडी कपाटाचे लॉकर फोडून चोरट्यांनी 40 हजार रुपये रोख रक्कम चोरली होती. त्याचबरोबर स्वयंपाकघरातील कपाटातून 20 हजार रुपये चोरीला गेले. तसेच बेडरूममधील गादीखाली ठेवलेल्या स्टीलच्या पेटीतून सोन्याचे मंगळसूत्र, सोन्याचा चपलाहार (25 ग्रॅम), 12 ग्रॅम वजनाचे दागिने आणि 2 ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या कानातल्या, अशा मिळून 44 ग्रॅम सोन्याचे दागिने चोरट्यांनी लंपास केले. या प्रकरणी अतुल रामभाऊ राऊत यांनी तिवसा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक बोरकर हे करीत आहेत.

# दोन घरे फोडली, 9 लाखांवर मुद्देमालाची चोरी

## नवीन घरात वास्तुशांती, तर जुने घर रिकामे

### साईनगर स्थित सरदार पटेल नगरातील घटना

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि.9)** - अकोली मार्गावरील साईनगर स्थित सरदार पटेल नगरात भरदिवसा चोरट्यांनी दोन घरे फोडून 9 लाख 47 हजाराचा मुद्देमाल लंपास केला आहे. या प्रकरणात पंकज दिगांबरराव दखने (34, रा. सरदार पटेल नगर) यांच्या तक्रारीवरून खोलापुरी गेट पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून पोलिसांकडून चोरट्यांचा शोध सुरू आहे.

पंकज दखने हे साईनगरातील सरदार पटेल नगरात राहत होते. त्यांनी मंगलधाम परिसरात नवीन घर बांधले असून, 5 नोव्हेंबर रोजी त्यांच्या घरात वास्तुशांतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यामुळे संपूर्ण कुटुंब दोन दिवस नवीन घरीच होते. दरम्यान, 7 नोव्हेंबर रोजी ते सरदार पटेल नगरातील जुन्या घरी गेले असता, चोरांनी त्यांच्या



घरातून सोन्याचे मंगळसूत्र, सोन्याच्या अंगठ्या, हार, बांगड्या, साखळ्या इत्यादी दागिने व रोख रक्कम असा मुद्देमाल चोरून नेला आहे. तसेच त्याच परिसरातील रहिवासी दिलीप चव्हाण हे शेगाव दर्शनासाठी गेले होते. ते घरी परतल्यानंतर, त्यांनाही आपल्या घरी चोरी झाल्याचे दिसून आले. या दोन्ही चोर्यांमध्ये चोरांनी तब्बल 9 लाख 47 हजार रुपये किमंतीचा मुद्देमाल चोरून नेल्याचे निदर्शनास आले. या घटनेची माहिती मिळताच खोलापुरी गेट पोलिस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी पंचनामा करून गुन्हा नोंदविला आहे.

# रब्बी हंगामास सुरुवात : आतापर्यंत 4 हजार 572 हेक्टरवर पेरणी

## हरभऱ्याची सर्वाधिक लागवड; गव्हाच्या पेरणीलाही प्रारंभ



**पेरणीचा आढावा**


| घटक | आकडेवारी |
|---|---|
| एकूण क्षेत्र | 1,54,010 हेक्टर |
| झालेली पेरणी | 4,572 हेक्टर |
| पेरणीची सरासरी | 2.97 टक्के |

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 9)** जिल्ह्यात रब्बी हंगामाची सुरुवात झाली असून आतापर्यंत एकूण 4 हजार 572 हेक्टर क्षेत्रावर पेरणी पूर्ण झाली आहे. यापैकी सर्वाधिक 4 हजार हेक्टरवर हरभऱ्याची लागवड करण्यात आली आहे. एकूण पेरणी क्षेत्राच्या तुलनेत आतापर्यंत 2.97 टक्के पेरणी पूर्ण झाली आहे.

खरिपातील सोयाबीन काढणी जवळपास संपत आल्यानंतरच रब्बी हंगामाची सुरुवात होते. जिल्ह्यात 1 लाख 54 हजार 10 हेक्टर क्षेत्र पेरणीखाली जाणार असून सध्या पेरणीची गती मंद आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे अनेक ठिकाणी सोयाबीन अद्याप पूर्णपणे निघालेले नाही. रब्बी हंगामातील मुख्य पिके म्हणजे गहू व हरभरा असून सिंचनाची सोय असलेल्या शेतकऱ्यांनी गव्हाची पेरणी सुरू केली आहे. धामणगाव रेल्वे तालुक्यात 261 हेक्टरवर गव्हाची पेरणी झाली आहे. तर धारणी, अमरावती, भातकुली, नांदगाव खंडेश्वर, चांदूर रेल्वे, तिवसा, दर्यापूर, अचलपूर आणि धामणगाव रेल्वे या तालुक्यांमध्ये हरभऱ्याच्या पेरण्या सुरू आहेत.

सिंचन असलेल्या भागात गहू आणि कोरडवाहू पट्ट्यात हरभरा या दोन्ही पिकांच्या लागवडीस गती मिळत आहे. यंदाही हरभऱ्याखालील क्षेत्रात वाढ होण्याची शक्यता कृषी विभागाने व्यक्त केली आहे.




# दोन महिलांमध्ये मारहाण

**अमरावती** - खोलापुरी गेट पोलिस स्टेशन हद्दीतील पटवीपुरा परिसरात मुलांमधील वादातून दोन महिलांमध्ये वाद झाला. या वादाच्या दरम्यान एका महिलेन दुसऱ्या महिलेला शिवीगाळ करत मारहाण केली. घटनेनंतर पीडित महिलेने पोलिसांत तक्रार दाखल केली असून, पोलिसांनी शनिवारी संबंधित आरोपी महिलेविरुद्ध गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

# चांदूर रेल्वेत आज 'आप'चा कार्यकर्ता मेळावा

**चांदूर रेल्वे** - आगामी नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आम आदमी पक्षाने शहर विकासासाठी कंबर कसली आहे. दिल्लीच्या आमदार व माजी मंत्री राखी बिर्ला यांच्या उपस्थितीत आज (दि. 10 नोव्हेंबर) दुपारी 12 वाजता संताबाई यादव मंगल कार्यालयात भव्य कार्यकर्ता मेळावा आयोजित करण्यात आला आहे. पत्रकार परिषदेत नम्रता नितीन गवळी यांनी सांगितले की, आप पक्ष स्वच्छ, पारदर्शक आणि जनहिताचे प्रशासन देण्यासाठी कार्यरत असून, दिल्लीच्या विकासाच्या धर्तीवर चांदूर रेल्वेचा सर्वांगीण विकास हा उद्देश आहे. शहरासाठी खड्डेमुक्त रस्ते, शुद्ध पाणी, सीसीटीव्ही, प्रकाशमान रस्ते, युवकांना रोजगार प्रशिक्षण, पारदर्शक निविदा प्रक्रिया आदी मुद्द्यांवर पक्ष निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहे. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आप नेते नितीन गवळी व सहकाऱ्यांनी केले.



# बोलेरोची दुचाकीला धडक

**अमरावती** - नांदगावपेठ पोलीस स्टेशन परिसरातील नागपूर-अमरावती महामार्गावर अंबा फर्टिलायझरसमोर एमएच 40/सीएक्स 8135 क्रमांकाच्या बोलेरोने शनिवारी सायंकाळी 5 वाजता दुचाकीला धडक दिल्याने नानाजी वाकपैजन जखमी झाले. त्यांच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. आम्रपाल वाकपैजन यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी बोलेरो चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# त्या अपघातातील दुसऱ्याही तरुणाचा मृत्यू

## शेगाव नाका चौकातील अपघात

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि.9)**- शहरातील शेगाव नाका चौकात काही दिवसांपूर्वी झालेल्या भीषण अपघातात जखमी झालेला सुमित नेभाणी याचाही उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. या अपघातात आता दोघा तरुणांचा दुर्दैवी अंत झाल्याने शहरात हळहळ व्यक्त केली जात आहे. अतिवेग आणि निष्काळजी वाहनचालकतेने पुन्हा दोन कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त केले आहेत. घटनेत मृत्यू झालेले दोघे युवक म्हणजे साहिल गुलशनकुमार मनसुखानी (वय 25) व सुमित नेभाणी (दोघेही रा. कृष्णानगर गल्ली क्र. 1, अमरावती) हे आहेत.



28 ऑक्टोबरच्या मध्यरात्री शेगाव नाका चौकात अतिवेगाने धावणाऱ्या एमएच-27/एआर-7689 या क्रमांकाच्या कारने त्यांची एमएच-27/बीएल-0017 ही दुचाकी जबर धडक दिली होती. या भीषण धडकेत साहिलचा मृत्यू घटनास्थळीच झाला, तर सुमित गंभीर जखमी अवस्थेत खासगी रुग्णालयात उपचार घेत होता. मात्र, गुरुवारी सायंकाळी त्यानेही अखेर श्वास घेतला. एका अपघातात दोन तरुणांचा मृत्यू झाल्याने कृष्णानगर परिसरात शोककळा पसरली आहे. दोघे बालपणीचे मित्र; एकाच शाळेत शिकलेले, एकाच गल्लीतील रहिवासी त्यांच्या मृत्यूने परिसरातील सर्वांचे डोळे पाणावले आहेत. याप्रकरणात गाडगेनगर पोलिसांनी कारचालकाविरुद्ध निष्काळजीपणे वाहन चालविल्याचा गुन्हा दाखल केला असून, वाहन पोलिसांच्या ताब्यात आहे. पुढील तपास सुरू आहे.

# नगराध्यक्ष व नगरसेवक पदांसाठी काँग्रेसमध्ये उमेदवारीची चुरस

## इच्छुक उमेदवारांसोबत काँग्रेस नेत्यांची भेट सुरू

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि.9)** - आगामी नगर परिषद व नगर पंचायत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षात उमेदवारीसाठी प्रचंड चुरस निर्माण झाली आहे. शनिवारी सायंकाळी अमरावती येथील नगर चौकातील काँग्रेस भवनात इच्छुक उमेदवारांसोबत पक्ष नेत्यांनी बैठक घेतली. या बैठकीस जिल्हा काँग्रेस कमिटी (ग्रामीण)चे अध्यक्ष अनिरुद्ध (बबलू) देशमुख अध्यक्षस्थानी होते, तर खासदार बलवंतराव वानखडे, माजी मंत्री यशोमती ठाकुर, माजी आमदार राजकुमार पटेल, जिल्हा प्रभारी सिद्धार्थ हत्तीअंभिरे यांच्यासह अनेक वरिष्ठ नेते उपस्थित होते.

या बैठकीत अचलपूर, दर्यापूर, चांदूर बाजार, अंजनगाव सुर्जी, नांदगाव खंडेश्वर, चांदूर रेल्वे, धामणगाव रेल्वे, धारणी, चिखलदरा, वरुड, मोर्शी व शेंदुरजना घाट अशा नगर परिषद व नगर पंचायत क्षेत्रांतील नगराध्यक्ष तसेच नगरसेवक पदांसाठी अनेकांनी उमेदवारीची दावेदारी सादर केली. सकाळी 11 ते दुपारी 3 या वेळेत काँग्रेस भवन परिसरात कार्यकर्त्यांची व इच्छुकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. बैठकीदरम्यान जिल्ह्यातील संघटन बळकट करण्यावर व योग्य उमेदवारांच्या निवडीवर भर देण्यात आला. काँग्रेस पक्षाने संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक व निष्पक्ष ठेवण्याचे आश्वासन दिले असून अंतिम उमेदवारांची घोषणा लवकरच करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा काँग्रेस कमिटीने दिली.

# पीएम आवास योजना ग्रामीण टप्पा-2 मध्ये जिल्ह्याची उल्लेखनीय कामगिरी

## 1 लाख 11 हजारांहून अधिक कुटुंबांचे सर्वेक्षण पूर्ण



महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि.9)** - प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण (टप्पा-2) अंतर्गत अमरावती जिल्ह्याने राज्यात उल्लेखनीय कामगिरी करत सर्वेक्षणाच्या टप्प्यात आघाडी घेतली आहे. जिल्ह्यात तब्बल 1 लाख 11 हजार 141 कुटुंबांचे सर्वेक्षण पूर्ण झाले असून नागरिकांचा स्वयं-सर्वेक्षण आणि सहाय्यित सर्वेक्षण या दोन्ही माध्यमांतून उत्स्फूर्त सहभाग नोंदवला गेला आहे.

सुमारे 30 ऑक्टोबरपर्यंत झालेल्या या सर्वेक्षणात धारणी तालुक्यात सर्वाधिक नोंदणी झाली आहे. जिल्ह्यातील 39 हजारांहून अधिक नागरिकांनी मोबाइल ॲपच्या माध्यमातून स्वयं-सर्वेक्षण केले, तर उर्वरित 71,840 लाभार्थ्यांचे सहाय्यक पद्धतीने सर्वेक्षण करण्यात आले. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेने या प्रक्रियेस गती देण्यासाठी 14 पंचायत समित्यांसाठी प्रशिक्षण कार्यशाळा घेतल्या. ग्रामसेवक, सरपंच आणि सर्वेक्षणकर्त्यांना प्रत्यक्ष प्रशिक्षण देऊन त्यांना योजनेबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. ज्या कुटुंबांकडे कायमस्वरूपी घर नाही आणि जे 2018 च्या प्रतीक्षा यादीत समाविष्ट नव्हते, अशा पात्र कुटुंबांना प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा-2 अंतर्गत लाभ मिळणार आहे. जिल्ह्याची ही कामगिरी ग्रामीण भागातील नागरिकांच्या सक्रिय सहभागामुळे शक्य झाल्याचे प्रशासनाने सांगितले.

**नागरिकांसाठी सोयीस्कर ॲपची सुविधा**

जिल्ह्यातील 39,301 नागरिकांनी मोबाइल ॲपचा वापर करून स्वत:चे सर्वेक्षण पूर्ण केले. या ॲपद्वारे आधार प्रमाणीकरण आणि जिओ-टॅग केलेले फोटो अपलोड करून पात्र नागरिकांना स्वत: नोंदणीची सुविधा देण्यात आली होती. उर्वरित 71,840 लाभार्थ्यांचे सहाय्यक पद्धतीने सर्वेक्षण करण्यात आले.

# दागिन्यांच्या दुकानातून कानातले चोरी

**अमरावती** - दर्यापूर पोलिस ठाणे हद्दीतील बसस्थानकातील दागिन्यांच्या दुकानातून बुरखा घातलेल्या एका अज्ञात महिलेने दोन ग्रॅम वजनाचे सोन्याचे कानातले चोरल्याची घटना शनिवारी दुपारी घडली. या प्रकरणी दुकानातील कर्मचारी गजानन अनासाने यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात महिलेविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# दागिने व रक्कम चोरी

**अमरावती** - दत्तापूर पोलीस स्टेशन हद्दीतील जे.बी. पार्क कॉम्प्लेक्समधील बंद घरातून अज्ञात चोरट्यांनी 1 लाख 34 हजार रुपयांचे दागिने व रोख रक्कम शनिवारच्या दुपारी चोरून नेली. मारुती किसन कार्लुके यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# दोन्ही नगर परिषदांमध्ये कमळ फुलवा!

## पालकमंत्री बावनकुळे यांचा कार्यकर्त्यांना विजयाचा मंत्र




महासागर | प्रतिनिधी

**अचलपूर, (दि.9)** - अमरावती जिल्ह्यातील अचलपूर-परतवाडा येथे शनिवारी झालेल्या आढावा बैठकीत पालकमंत्री तथा भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी आगामी नगर परिषद निवडणुकांसाठी कार्यकर्त्यांना उत्साहाने झोकून देण्याचे आवाहन केले. चांदूर बाजार आणि अचलपूर नगर परिषद या दोन्ही ठिकाणी भाजपचा झेंडा फडकवण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने घराघरात जनसंपर्क साधावा, असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले.

बैठकीस जिल्हा पदाधिकारी, तालुका प्रमुख, नगरसेवक आणि स्थानिक नेते उपस्थित होते. बैठकीत संघटनात्मक कामकाजाचा आणि निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेण्यात आला. यावेळी बावनकुळे म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात विकासाची नवी दिशा सुरू झाली आहे. हा विकास प्रत्येक गावापर्यंत पोहोचवणे ही कार्यकर्त्यांची जबाबदारी आहे. त्यांनी कार्यकर्त्यांना मतभेद विसरून एकत्र येण्याचे आवाहन केले आणि युवक तसेच महिला कार्यकर्त्यांनी सोशल मीडियाचा वापर करून प्रचार अधिक प्रभावी करण्याचे सुचवले. जिल्हा पदाधिकाऱ्यांनी यावेळी प्रचार आराखडा आणि स्थानिक आव्हानांवर चर्चा केली. बावनकुळे यांनी प्रत्येक विभागासाठी स्वतंत्र जबाबदारी निश्चित करत टीमवर्कचे महत्त्व स्पष्ट केले. बैठकीचा समारोप पक्ष विजयाच्या घोषणांनी झाला. कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पसरले असून चांदूर बाजार व अचलपूर नगर परिषद निवडणुकीत 'कमळ' फुलविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

# भूखंडाचे श्रीखंड आणि सुपरफास्ट ॲक्शन

बॅरीस्टर ए. आर. अंतुले मुख्यमंत्री असतानाच्या काळात भूखंडाचे श्रीखंड हा शब्द पहिल्यांदा प्रचलित झाला. त्यानंतर इतक्या वर्षांनी आता पवार कुटुंबातील पोराने पुण्याची जागा हडपल्याचे प्रकरण गाजते आहे आणि भूखंडाचे श्रीखंड त्यांना पचायला जड जाते आहे . पुण्यातील महार वतनाची जमीन जिची किंमत 1800 कोटी रूपये असल्याचे सांगितले जाते ती या महाभागांनी 300 कोटीत घशात घातली आणि त्यासाठी भरावे लागणारे मुद्रांक शुल्क माफ करून घेतले . अर्थात, प्रकरण उघड झाल्यानंतर आता हा व्यवहार रद्द करण्यात आला असला तरी चोरी झाली आहे. मग, चोरांना सोडणार का? असा सवाल विरोधकांकडून केला जात आहे . विशेष म्हणजे सत्ताधारी नेत्यांवर आणि सरकारवर तुटून पडणारे पवार कुटुंबातील रोहित पवार, सुप्रिया सुळे यावेळी मात्र सत्याची बाजू लपवत कुटुंबाची पाठराखण करीत आहेत.

या प्रकरणात कारवाई होणारच, केसेस सुरूच राहतील, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. त्यावर आता आमदार रोहित पवार बोलू लागले आहेत. राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जवळच्या व्यक्तीवर कारवाई होत नाही. पण ज्यांचा राजकीय गेम करायचा आहे त्याच्यावर मात्र कारवाई होते.

सरकारच्या एका विभागाने सांगून सुद्धा मी समोर आणलेल्या सिडको घोटाळ्याप्रकरणी कारवाई झाली नाही, पण पार्थ पवार यांच्या प्रकरणी सुपरफास्ट कारवाई केली जात आहे, असा भेदभाव न करता कारवाई करण्यात यावी असे राष्ट्रवादी कॉँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी म्हटले आहे.

सिडकोचे प्रकरण असो की नवी मुंबईमधील खडीचे प्रकरण असो की नाशिकमधील जमिनीचे प्रकरण, शिरसाट यांच्या एमआयडीसीचा मुद्दा असे अनेक मुद्दे आहेत. ज्या काही सरकारी जमिनी आहेत किंवा कुळाच्या जमिनी आहेत कुणाच्याच नावाने होत नाही त्यावर ज्यांनी ज्यांनी ताबा घेतला आहे किंवा त्यावर घातले आहे अशा सर्वांवर



कारवाई करण्यात यावी.

पुण्यातील बहुचर्चित मुंढवा जमीन गैरव्यवहार प्रकरणावरून विरोधी पक्षांनी केलेल्या आरोपांवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मन मोकळे केले. पार्थ पवार यांच्या 'अमेडिया' कंपनीमार्फत करण्यात आलेला हा जमीन खरेदीचा व्यवहार नंतर रद्द करण्यात आला असला तरी, या अनुषंगाने उपस्थित झालेल्या प्रश्नांची उत्तरे देत अजितदादांनी आपल्यावरील जुन्या आरोपांचे 'शल्य' बोलून दाखवले.

निवडणुका सुरु झाल्या की आमच्यावर आरोप होतात. याआधी देखील माझ्यावर असेच आरोप झाले. पण त्यातून काही निष्पन्न झाले नाही. मात्र बदनामी झाली, असे अजित पवार म्हणालेत.

मुंढवा प्रकरणातील कथित कागदपत्रांवर आश्चर्य व्यक्त करताना अजित पवार म्हणाले, 1 रुपयाचा व्यवहार न करता नुसते आकडे लिहून कसा काय कागद तयार होऊ शकतो? हे आजपर्यंत मला कळलेले नाही. या प्रकरणातील नोंदणी प्रक्रियेवर त्यांनी थेट बोट ठेवत प्रशासकीय यंत्रणेवर प्रश्न उपस्थित केला. याविषयीची वस्तुस्थिती एका महिन्यात कळेल, असेही सूतोवाच त्यांनी केले.

विरोधकांकडून होणारे आरोप हे निवडणुकीच्या तोंडावर जाणीवपूर्वक केले जातात, असे शल्य अजित पवार यांनी बोलून दाखवले. ते म्हणाले, मुख्यमंत्र्यांनी चांगले अधिकारी चौकशी समितीत घेतले आहेत, त्यामुळे महिन्याभरात वस्तुस्थिती समोर येईल. निवडणुका सुरू झाल्या की आमच्यावर आरोप सुरु होतात. कुठूनतरी, काहीतरी असे काहीतरी बाहेर आणले जाते. आपण पारदर्शकपणे काम करत असताना, केवळ राजकीय हेतुने बदनामी केली जाते, हे सांगायला अजित पवार विसरले नाहीत. सकाळपासून रात्रीपर्यंत लोकांची कामं करायची. पारदर्शकता कशी राहील ते बघायचे. नियमाला धरून सगळे करायचे... चूक होणार नाही त्याची काळजी घ्यायची आणि लगेच बारामतीतील कुठल्या कुठल्या जमिनीचे काहीही काढायला लागले," असे ते म्हणाले. तसेच माझ्या राजकीय कारकिर्दीला सुरुवात झाल्यापासून मी कुठलीही चुकीची गोष्ट होऊ देत नाही, असेही त्यांनी विरोधकांना ठणकावून सांगितले.

मुंबईतही सांगितले, पुण्यातही आणि आता इथे ही सांगतो की माझ्या नावाचा वापर करून, मग माझे जवळचे नातेवाईक, कार्यकर्ते, अधिकारी असतील, त्यांनी जरी यदाकदाचित काही सांगितले, ते जर नियमाला धरून नसेल, तर संबंधित अधिकाऱ्याने ते काम करता कामा नये, असा सज्जड दम अजितदादांनी पत्रकार परिषदेतून दिला. क्लास वन, टू आणि सर्व अधिकारी, आयएएस,आयपीएस अधिकाऱ्यांना त्यांनी नियमात न बसणारे काम न करण्याचे आवाहन अजित पवार यांनी केले.

दुसरीकडे, पोराच्या घोटाळ्याविषयी वडीलांनी खुलासे केले असले तरी विरोधक आरोपांचे टीकास्त्र डागतच आहेत. बापाने 70 हजार कोटी पचवले साधा ढेकर दिला नाही, आता पार्थ पवारांच्या घोटाळ्यावर 'मुळशी पॅटर्न 2' बनावा, अशी उपरोधिक मागणी लक्ष्मण हाके यांनी केली आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणात एका मोठ्या जमिनीच्या खरेदी व्यवहारामुळे खळबळ उडाली आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांचे सुपुत्र पार्थ पवार यांच्या अमेडीया होल्डिंग्स एलएलपी या कंपनीवर गंभीर आरोप झाले आहेत.

आता या प्रकरणावरून ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी अजित पवारांवर निशाणा साधला आहे. बापाने 70 हजार कोटी पचवले साधी ढेकर दिली नाही. पार्थ पवार 1500 कोटींच्या घोटाळ्यात सापडले. पार्थ पवारांच्या गंडलेल्या घोटाळ्यावर मुळशी पॅटर्न 2 चित्रपट बनावा, अशी उपरोधिक मागणी लक्ष्मण हाके यांनी केली आहे.

अमेडीया कंपनीने तब्बल 1804 कोटी रुपयांच्या बाजारभावाची जमीन केवळ 300 कोटी रुपयांत विकत घेतल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे. विशेष म्हणजे, या खरेदी व्यवहारानंतर अवघ्या दोन दिवसांतच स्टॅम्प ड्युटी माफ करण्याचे आदेश देण्यात आले, असा दावाही करण्यात आला आहे. त्यामुळे सरकारी नियमांचा भंग करून हा व्यवहार करण्यात आल्याचा आरोप विरोधकांकडून जोरदारपणे करण्यात येत आहे.

या प्रकरणामुळे राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. वाढत्या दबावानंतर अमेडीया कंपनीने हा जमीन खरेदी व्यवहार रद्द करण्याचा निर्णय घेतला असून, त्यासंदर्भातले पत्र संबंधित विभागाला सादर करण्यात आले आहे. दरम्यान, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यासाठी राज्य सरकारने विशेष समितीची नेमणूक केली आहे. या घडामोडींवर ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी टीकास्त्र सोडले. यासंदर्भात त्यांनी सोशल मीडियावर पोस्ट लिहून उपरोक्त उपरोधिक मागणी केली.

# पंढरपूरमध्ये उभा राहतोय पृथ्वीवरील वैकुंठ!



महाराष्ट्राची आध्यात्मिक राजधानी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पंढरपूर नगरीत इस्कॉन पंढरपूरतर्फे भूवैकुंठ प्रकल्प या भव्य आध्यात्मिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक केंद्राच्या उभारणीचे काम वेगाने सुरू आहे. श्री श्री राधा पंढरीनाथ भगवंतांना समर्पित असलेला हा प्रकल्प पंढरपूरच्या अध्यात्मिक वैभवाला नवे रूप आणि नवा सोपान देणारा ठरेल.

चंद्रभागा नदीच्या पवित्र तीरावर सुमारे १२ एकर भूमीवर उभारत असलेले हे केंद्र भूवैकुंठ - पृथ्वीवरील वैकुंठ म्हणून ओळखले जाईल. येथे शुद्ध भक्ती, वारकरी परंपरा आणि सामाजिक सेवेचा सुंदर संगम साधला जाणार आहे. सुमारे ३ लाख चौरस फुटांवर विस्तारलेला हा ह्यन भूतो न भविष्यतिह्न असा प्रकल्प आशिया खंडातील इस्कॉनचा दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा प्रकल्प ठरणार आहे.

यात भव्य मंदिर सभागृह, हजाराहून अधिक भाविकांसाठी निवास व्यवस्था, अन्नक्षेत्र (प्रसाद वितरण केंद्र), गोशाळा, संस्कृती रंगमंच, 7 थिएटर, प्रभुपाद संग्रहालय, तसेच आरोग्य व कल्याण सुविधा उभारल्या जात आहेत.

मंदिरात श्री श्री राधा पंढरीनाथ, श्री श्री सीता-राम-लक्ष्मण-हनुमान, आणि श्री श्री गौर-निताई यांच्या मनोहर मूर्तींची प्रतिष्ठापना होणार असून, हे मंदिर भाविकांसाठी दिव्य अनुभव आणि आत्मिक शांतीचे केंद्र ठरणार आहे.

या प्रकल्पाचा अंदाजे खर्च १५० कोटी असून, समर्पित भक्त, उदार दानदाते आणि हितचिंतक यांच्या सढळ योगदानातून हे भव्य कार्य पूर्णत्वास नेले जात आहे. इस्कॉन पंढरपूरने सर्व भाविकांना पुंडलिक वीट सेवा आणि एक चौरस फूट मंदिर दान योजना यांसारख्या विविध सेवांमधून सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

या प्रकल्पामागे इस्कॉन पंढरपूरची दूरदृष्टी, संघटनशक्ती आणि अद्वितीय टीमवर्क आहे. श्रीमान प्रल्हाद प्रभू यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेली ही टीम, इस्कॉनचे संस्थापक-आचार्य श्रील प्रभुपाद यांच्या शिकवणुकीला जीवनात उतरवत आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकल्पाने केवळ विटा-गिलावा नव्हे, तर भक्ती, सेवा आणि शिक्षणाचा जागर उभा केला आहे.

परमपूज्य लोकनाथ स्वामी महाराज यांच्या स्फूर्तीने इस्कॉन पंढरपूरची टीम भूवैकुंठ प्रकल्पाला केवळ मंदिर म्हणून नव्हे, तर समाजकल्याण, संस्कृती संवर्धन आणि अध्यात्माचे केंद्र बनविण्यासाठी समर्पितपणे प्रयत्नशील आहे.

येथे चालणारे अन्नदान, सांस्कृतिक वारसा संवर्धन, महिला व युवक सशक्तीकरण, आणि आध्यात्मिक शिक्षणाचे कार्यक्रम हे या मिशनचा अविभाज्य भाग आहेत.

हा संपूर्ण उपक्रम इस्कॉन पंढरपूरचे अध्यक्ष प्रल्हाद दास प्रभू यांच्या संकल्पनेतून उभा राहतोय. त्यांच्या टीमने सोबत या आध्यात्मिक उपक्रम कार्यासाठी स्वतःला प्रचंड वाहून घेतले आहे. या भूवैकुंठ प्रकल्प संदर्भात बोलतांना प्रल्हाद दास प्रभू म्हणाले की, भूवैकुंठ हा केवळ मंदिर उभारणीचा प्रकल्प नाही; तो मानवतेच्या कल्याणाचा सशक्त संकल्प आहे. भक्ती, शिक्षण आणि सेवेच्या माध्यमातून लोकांच्या जीवनात अध्यात्म आणणे हे आमचे उद्दिष्ट आहे.

लाखो यात्रेकरूंना पंढरपूरात आल्यावर येथे प्रभुपादांच्या सेवेची, लोकनाथ स्वामींच्या करुणेची आणि भक्तांच्या प्रेमाची अनुभूती मिळेल. भूवैकुंठ प्रकल्प पंढरपूरला एक जागतिक आध्यात्मिक गंतव्य बनवेल, जिथे भक्ती, संस्कृती, सेवा आणि विज्ञान यांचे नवे युग सुरू होईल.

या पवित्र स्थळीच येत्या १५ आणि १६ नोव्हेंबर २०२५ रोजी व्हॉईस ऑफ मीडिया आणि व्ही.ओ.एम. इंटरनॅशनल फोरम या आंतरराष्ट्रीय पत्रकार संघटनेचे राज्य शिखर अधिवेशन भव्य स्वरूपात संपन्न होणार आहे. अधिक माहिती किंवा सहभागासाठी iskconbhuvaikuntha.com किंवा 90962 53633 या क्रमांकावर संपर्क साधता येवू शकेल.

■ ■ ■

# आपले कर्म हाच खरा धर्म!

वाचक लिहितात

एक आमदार होते. ते सकाळच्या वेळेला दोन-दोन तास पुजा करीत असतं. भेटीसाठी आलेली मंडळी ताटकळत बसत. साहेब आता येणार, थोड्या वेळाने येणार म्हणून वाट पहात बसत. असे करता करता कसे पाच वर्षे कधी निघून गेले हे कळले सुध्दा नाही. निवडणुकीची वेळ आली लोकांनी ठरविले यांना अती पुजेची आवड आहे ना मगं करत बस म्हणावं! कर्तव्य हीच खरी पुजा. हे न समजू शकल्या कारणाने जनतेने त्यांना घरी बसविले.

दुसरे एक उदाहरण. ते डॉ. महाशय आहेत. ते नमाजाची वेळ काटेकोरपणे पाळतात.त्यांच्याकडे येणारे पेशंट ताटकळत बसतात. काहिंनी खुप वेळ लागतो आहे डॉ.साहेब म्हणून तक्रार केली. तेंव्हा कुणा पेशंटला किती वेळ लागू शकतो हे सांगता येत नाही अशी नोटीस त्यांनी दवाखाण्यात लावली. सध्यातरी पेशंटला पर्याय मिळाला नसावा म्हणून तो हे सर्व खपवून घेतो आहे. पर्याय मिळाला की तो पणं हिसका दाखविल्या शिवाय राहणार नाही. म्हणून म्हणतो आहे 'आपले कर्म हाच खरा धर्म'!

मग ते चांगले असो वा वाईट. त्यानुसार फळ मिळणारच! मनुष्य हा धरतीवर कर्म करण्यासाठीच आला आहे. जन्मापासून अंतापर्यंत तो कर्मच करीत असतो. या युगात चांगले कर्म करणाऱ्यालाच दुःख भोगावे लागते आहे. वाईट कर्म करणारा मजा मारतो आहे.तोच या जगावर राज्य करतो आहे. असे चित्र सर्वत्र पहायला मिळते आहे. कलियुगाचा महिमा म्हणून लोक याकडे पहातात आहेत.घटनेतील तत्वानुसार प्रत्येक व्यक्तीचा धर्म हा त्याचा खाजगी विषय आहे.यात इतरांनी नाक खुपसता कामा नये. मग तो नास्तिक असो वा आस्तिक. धर्मामध्ये चांगल्या आचरणावर भर दिला गेला आहे. दुराचाराचा तिरस्कार केला गेला आहे.या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. हे समजून घेऊन आपले व्यवहार सुरू ठेवावेत. यातच जीवनाचे खरे सार दडलेले आहे.

■ मिलिंद गड्डमवार
राजुरा. 9511215200

# सुलक्षणा पंडित आणि संजीव कुमार प्रेम जे शब्दांत कधी आलंच नाही

बॉलीवूडच्या झगमगाटात असंख्य प्रेमकथा उमलल्या, काही फुलल्या, काही कोमेजल्या पण काही अशा होत्या ज्या कधी सुरुवात झाली की शेवट हेच कळलं नाही. अशीच एक कथा गाण्यांइतकी मधुर पण शेवटपर्यंत न उच्चारलेली म्हणजे सुलक्षणा पंडित आणि संजीव कुमार यांचं प्रेम.





सुलक्षणा पंडित या अतिशय सुंदर आणि मधुर आवाज असलेल्या अभिनेत्री आणि गायिकेचं संजीव कुमारवर प्रेम होतं, तिने त्यांना प्रपोज देखील केलं होतं पण संजीव कुमारचा जीव हेमा मालिनीवर जडला असल्याने त्यांनी सुलक्षणा पंडित यांना नकार दिला. आयुष्यात कधी, केव्हा, कोण कोणाला का आवडेल किंवा का आवडणार नाही, हे सांगणं कठीण आहे! प्रेमाची व्याख्या तशी कुणाला करता आलीच नाही!

सत्तरच्या दशकात सुलक्षणा पंडित हे नाव गायकीत झळकत होतं. घराणं संगीतमय पंडित परिवारात जन्मलेली सुलक्षणा ही अभिनयाचा संगम आणि सुरांच्या दुनियेत वाढलेली. त्याच काळात संजीव कुमार म्हणजे अभिनयातील एक विद्यापीठच! कोशिश, आंधी, शोले, आणि अनामिका सारख्या चित्रपटांनी त्यांना अभिजात उंची गाठून दिली होती.

दोघांची भेट झाली एका चित्रपटाच्या निमित्ताने व्यावसायिक ओळखीतून हळूहळू एक भावनिक नातं आकार घेत गेलं. सुलक्षणाच्या मनात संजीवसाठी एक आदर, एक आकर्षण आणि एक प्रेम निर्माण झालं, जे तिनं कधीही लपवलं नाही. सुलक्षणा पंडित यांनी अनेक मुलाखतींमध्ये स्पष्ट सांगितलं मी संजीव कुमार यांना मनापासून प्रेम केलं.

त्यांचं प्रेम एकतर्फ होतं, पण शुद्ध आणि निखळ होतं. संजीव कुमार मात्र त्यांच्या आयुष्यात हेमा मालिनीसाठीचं आपलं प्रेम घेऊन फिरत होते आणि ते प्रेमही अधुरं राहिलं. एकाच्या हृदयात दुसऱ्याचं नाव, आणि तिसऱ्याच्या मनात वेदनेचा प्रवाह. या त्रिकोणात सुलक्षणाचं आयुष्य हळूहळू विरघळत गेलं. सुलक्षणाच्या आवाजात अनेक गाणी होती, पण काही गाणी जणू तिच्या स्वतःच्या भावना गात होती, सुरांत जपलेलं प्रेम जसे तू इस तरह से मेरी जिंदगी में शामिल है हे गाणं जरी चित्रपटासाठी रेकॉर्ड झालं, तरी प्रत्येक ओळीमध्ये तिच्या अधुऱ्या प्रेमाची जाणीव होती.

संजीव कुमार मात्र त्यांच्या शांत, अंतर्मुख स्वभावामुळे कधीच काही बोलले नाहीत. पण त्यांच्या डोळ्यांत ती गहन वेदना आणि न बोलेले शब्द दिसायचे, जे फक्त सुलक्षणासारख्या संवेदनशील मनालाच जाणवले असतील. संजीव कुमार शेवटपर्यंत अविवाहित राहिले. त्यांच्या निधनानंतर सुलक्षणा पंडित कोलमडून गेल्या.

त्यांनीही पुन्हा लग्न केलं नाही आणि अनेक वर्षं एकाकीपणात जगल्या. त्यांच्या मनात एकच सत्य कायम होतं. जे प्रेम कधी मिळालं नाही, तेच खरं होतं. त्यांची अधूरी कहाणी, पण अमर नातं. ही कथा ना पत्रांत लिहिली गेली, ना गाण्यांत पूर्ण झाली पण ती भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वांत हृदयस्पर्शी प्रेमकथा ठरली.

सुलक्षणा आणि संजीव कुमार यांनी जगाला शिकवलं. प्रेम म्हणजे मिळवणं नाही, तर शांतपणे आठवणीत जगणं होय. त्यांचं नातं काळाच्या पलीकडे गेलं, एकानं गाण्यांतून बोललं आणि दुसऱ्यानं नजरेतून. दोघांनीही जीवनभर मौन पाळलं, पण त्या मौनातही शब्दांपेक्षा गहिरं प्रेम होतं. कदाचित सुलक्षणा कालपर्यंत त्या स्वरांत हरवत होती आणि संजीव कुमारच्या स्मितात ती अजूनही उत्तर शोधत होती. प्रेम कधी-कधी संपत नाही, ते फक्त एक सुरात रूपांतरित होतं.



**प्रविण बागडे**
नागपूर.
9923620919

सुलक्षणा पंडित यांचं पारिवारिक जीवन कटकटींनी भरलेलं होतं. त्यांचे वडील, दोन्ही काका, (एक काका पंडित जसराज), बंधू प्रसिद्ध संगीतकार जतीन-ललित, मंधीर हा अजून एक भाऊ देखील संगीतकार, एक बहीण सुप्रसिद्ध अभिनेत्री विजयता, तिचा नवरा सुप्रसिद्ध संगीतकार आदेश श्रीवास्तव, चुलत बहीण सुप्रसिद्ध गायिका हेमलता... सारेच संगीत क्षेत्राशी संबंधित असले तरी त्यांचं प्रत्यक्ष जीवन मात्र संगीतमय होऊ शकलं नाही.

वडिलांनी दुसरा विवाह केला आणि या परिवाराला गरिबीचे दिवस आले. त्यांनी गायन सुरु केलं. हळूहळू अभिनय क्षेत्रातही उतरल्या. दोन्ही क्षेत्रात त्यांनी नाव कमावलं. पण आईचं, मोठ्या भावाचं निधन, सिनेसृष्टीत अपेक्षित यश न मिळणं, अपघात (बाथरूममध्ये पाय घसरून पडणं) अशा अनेक घटनांनी त्यांच्यावर मानसिक आणि शारीरिक आघात केले. संजीव कुमारसाठी त्या कायम अविवाहित राहिल्या! त्यांच्या अपुऱ्या प्रेम कहाणीसाठी 'सरस्वती चंद्र' चित्रपटातील गीतकार इंदीवर यांनी लिहिलेल्या आणि लता मंगेशकर यांनी गायलेल्या या ओळी आठवतात.

*तन से तन का मिलन हो न पाया तो क्या*
*मन से मन का मिलन कोई कम तो नहीं*
*चाँद मिलता नहीं सबको सँसार में*
*है दिया ही बहुत रोशनी के लिए*

त्यांच्या जीवनातील संजीव कुमार नावाचा दिया गेला हा दिया गेला आणि त्या डीप डिप्रेशनमध्ये गेल्या!

*दिल में ऐसा दर्द छुपा है, मुझसे सहा न जाए*
*कहना तो चहू अपनों से मई, फिर भी कहा न जाये*
*आँसू भी आँखों में आये, चुपके से पी जाऊ*
*जीवन के पिंजरे में, मनन का ये पंछी*
*कैसे कैद से छूटे*
*जीना होगा इस दुनिआ में,*
*जब तक साँस न टूटे*
*दम घुट ता है अब सांसो का,*
*कैसे बोझ उठाऊ*
*अपने जीवन के इस उलझन को कैसे मैं सुलझाऊ..*

उलझन चित्रपटातील हे सुंदर गाणं त्यांचं जीवन झालं! आयुष्यातील उलझन त्या कधीही सोडवू शकल्या नाहीत! ज्या अभिनेत्यावर जीवापाड प्रेम केलं, त्याच्याच मृत्यूच्या दिवशी तिचं निधन व्हावं! किती विलक्षण योगायोग आहे! ६ नोव्हेंबर रोजी संजीव कुमार यांच्या मृत्यूनंतर जवळपास ४० वर्षांनी त्याच तारखेला त्यांचा मृत्यू झाला! प्रतिभासंपन्न अभिनेत्री सुलक्षणा पंडित यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

■ ■ ■

# गोल्ड मॉनिटायजेशन स्किमचे फायदे काय आहेत?

आपण अनेक महिन्यासापून सोन्याबद्दल सविस्तर चर्चा करीत आहोत. गेल्या आठवड्यात गोल्ड मॉनिटायझेशन स्कीम (सुवर्ण मुद्रीकरण योजना) म्हणजे काय? ही योजना कशी कार्य करते? या योजनेमध्ये सोने, चांदी, नाणे किंवा बार (लगड) मध्ये पैसे ठेवता येतात. ही योजना भारतात आणण्याचे उद्देश्य काय आहे? इत्यादी माहिती बघितली. आज आपण गोल्ड मॉनिटायझेशन स्कीमबद्दल अधिकची माहिती जाणून घेणार आहोत.

**प्रश्न : सुवर्ण मुद्रीकरण योजणे चे फायदे काय आहेत?**

■ 2004 मध्ये सोन्याचे भाव 5850/- रुपये प्रती तोळा होते. आज दिवाळी 2025 ला हेच भाव चेन्नईला 135,000 ओलांडल्याची माहिती आहे. यात आपल्या लक्ष्यात येईल की सोनं फक्त संभाळ्ल तर एवढे लाखो रुपयांची प्रतितोळा वाढ मिळाली आहे.

जर यात अजून वाढ पाहिजे असेल तर घरात नुसत्या पडलेल्या सोन्यावर पुन्हा 2.5% वाढ या योजनेत मिळू शकते. सोप्या भाषेत आपण असे म्हणू शकतो की वस्तूला उत्पन्न देणाऱ्या रुपयामध्ये रुपांतरीत करणारी ही योजना आहे.

संक्षिप्त मध्ये असे बोलले तर वावगे होणार नाही की ही योजना सामान्य बँकिंग व्यवहारासारखीच आहे. फक्त फरक एवढाच आहे की येथे व्यवहार रुपयात न होता सोन्यात व्यवहार केला जातो.

याचा दुसरा फायदा असा आहे की सोनं, नाणं, बार, ज्वेलरी इत्यादी वर व्याज तर मिळतोच वरून त्या मिळणाऱ्या व्याजावर इन्कमटॅक्स अजिबात लागत नाही.

तिसरा फायदा असा की सोन्याचे वाढीव भाव गुंतवणूक दारांना मिळतात. त्यामुळे गुंतवणूक करणा?याचे काहीच नुकसान होत नाही. चौथा फायदा धर्मदाय संस्था सुद्धा याच्यात आता गुंतवणूक करू शकतात. इतकेच नाहीतर केंद्रीय किंवा राज्य सरकारच्या अधिनस्थ असलेल्या परंतु वेगळ्या अस्तित्व असणाऱ्या कंपन्यांना सुद्धा या योजनेचा फायदा घेता येतो.

शेवटचा अति महत्वाचा फायदा असा आहे की या योजनेत गुंतवलेल्या पैशावर भांडवली नफा म्हणजे कॅपीटल गेन टॅक्स अजिबात लागत नाही. एवढेच काय तर मिळणाऱ्या व्याजावर सुद्धा इन्कमटॅक्स पूर्णपणे माफ आहे.

खरेतर ही योजना फार चांगली आहे परंतु नागरिकांचे लक्ष याकडे पाहिजे तेवढे नसल्याचे तज्ञांचे मत आहे किंबहुना सरकारची मार्केटिंग स्ट्रेटेजी थोडी कमी पडत आहे, असे म्हण्टल्यास वावगे ठरू नये.

**प्रश्न : गोल्ड मॉनिटायझेशन स्कीममुळे इन्कमटॅक्स कायद्यात काय-काय बदल करण्यात आले आहे?**

■ या स्कीममुळे इन्कमटॅक्स कायद्यात खालील महत्वाचे पूरक बदल करण्यात आलेले आहेत. ज्यामुळे गुंतवणूक करणाऱ्यांना प्रत्यक्ष फायदा मिळेल. सर्वात पहिला बदल म्हणजे इन्कमटॅक्स कायद्याचे कलम 2(14) मध्ये बदल करण्यात आले आहे. आता नवीन बदलानुसार, कॅपीटल असेट या परिभाषेतून गोल्ड डीपॉजीट सरटीफीकेट वगळण्यात आले आहे.




**सोप्या भाषेत इन्कमटॅक्स आणि इन्वेस्टमेन्ट**

**सीए. गोविंदप्रसाद एस. मुंदडा**
**सीए. आकाश जी. मुंदडा**
**जालना.**

या बदलाचा सोप्या भाषेत अर्थ असा की गोल्ड डीपॉजीट ही कॅपीटल असेट म्हणजे कायद्यान्वय प्रॉपर्टी राहणार नाही. यामुळे कॅपीटल गेन्स टॅक्स ही लागणार नाही या आशयाचे बदल इन्कमटॅक्सच्या कलम 2(14)(५) मध्ये करण्यात आले आहे. हा बदल 1 एप्रिल 2016 पासून लागू झाला आहे. याशिवाय दुसरा महत्वाचा बदल म्हणजे कलम 10(15) मध्ये करण्यात आलेला आहे.

म्हणजे या बदलामुळे या स्कीम मध्ये मिळणाऱ्या व्याजावर इन्कमटॅक्स लागणार नाही. कलम 10 हे टॅक्स मुक्त उत्पन्न देणारे कलम आहे. हा बदल पण 1 एप्रिल 2016 पासून लागू झालेला आहे.

पुढील आठवड्यात आपण याची प्रक्रिया काय असते. याचे स्टेप्स कसे कार्यान्वित होतात? इत्यादी याच स्कीमची नवीन माहिती बघणार आहोत. ज्या वाचकांचे काही प्रश्न असतील त्यांनी सविस्तर प्रश्न 9422218428 या वर फक्त व्हॉटसॲप करावे, ज्याची उत्तरे लेखमालेत याच पेपर मध्ये आपल्या नावासह निःशुल्क दिली जातील.

■ ■ ■

# हाडे मजबूत ठेवायचेत? मग हे वाचा..




हाडे केवळ शरीराला आधार देत नाहीत, तर आपल्या रक्तातील कॅल्शियमचे संतुलन राखण्यात देखील मोठी भूमिका बजावतात. वृद्धत्व, हार्मोनल बदल, चुकीचा आहार आणि शारीरिक हालचालींचा अभाव यामुळे हाडांची घनता कमी होते, ज्यामुळे गंभीर नुकसान होऊ शकते.

मजबूत हाडे शरीराला सक्रिय ठेवतात, पडझडीत सहज फ्रॅक्चर होऊ देत नाहीत आणि जीवनाची गुणवत्ता सुधारतात. जेव्हा हाडांची घनता कमी होऊ लागते तेव्हा शरीर हळूहळू कमकुवत होऊ लागते. सुरुवातीला, लक्षणे खूप सौम्य असतात, जसे की सांध्यामध्ये सौम्य अस्वस्थता, शरीरात थकवा किंवा चालताना दबाव जाणवणे.

आहारामध्ये कॅल्शियम आणि व्हिटॅमिन डीची कमतरता दीर्घकाळ कायम राहिली तर ऑस्टिओपोरोसिसचा धोका वाढतो. यामध्ये हाडे कमकुवत होतात.

आरोग्य तज्ञांच्या मते, कॅल्शियम, व्हिटॅमिन-डी आणि प्रथिने समृद्ध असलेला आहार ही सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे. शाकाहारी लोकांनी दूध, दही, पनीर, ताक, तीळ, बदाम, राजमा, चणे, मेथी, सोयाबीन आणि पालक, मेथी, मोहरीच्या हिरव्या भाज्या यासारख्या हिरव्या पालेभाज्यांचा समावेश आपल्या रोजच्या आहारात केला पाहिजे. ओमेगा -3 हाडांसाठी देखील फायदेशीर मानला जातो, ज्यासाठी अंबाडी हा एक चांगला पर्याय आहे. त्याच वेळी, मांसाहारींसाठी दुग्धजन्य पदार्थांबरोबरच सॅल्मन आणि सार्डिन, अंडी, चिकन आणि हाडांचा मटनाचा रस्सा यांसारखे मासेही खूप उपयुक्त मानले जातात. सूर्यप्रकाश घेणे देखील महत्वाचे आहे, जेणेकरून शरीर स्वतःच व्हिटॅमिन डी बनवू शकेल. दररोज सकाळी 15-20 मिनिटे उन्हात बसण्याचा प्रयत्न करा.

■ ■ ■

**अशोकायन**
प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



## वंदे मातरम्..!

हॅलो २२ हॅलो २२
काय म्हणताय
वंदे मातरम् म्हणा ना..

जानता अजानता
का होईना राष्ट्रभक्ति
प्रज्वलीत होईल ना...

वंदे - मातरम्
भारतिय ब्रँड
त्याचाच वापर करा ना !

# सालबर्डी परिसरात भरधाव चारचाकी वाहन उलटले

## 16 प्रवासी जखमी ◆ पुसदा गावच्या कुटुंबीयांचा भीषण अपघात

महासागर | प्रतिनिधी

**मोर्शी,( दि.9 )-** तालुक्यातील सालबर्डी परिसरात रविवारी दुपारी दिड वाजताच्या सुमारास झालेल्या 20 प्रवासी असलेली चारचाकी गाडी उलटल्याने 16 प्रवासी गंभीर जखमी झाले, तर 4 जणांना किरकोळ दुखापत झाली आहे.

पुसदा येथील रहिवासी उषाताई राऊत यांच्या अस्थी विसर्जनासाठी सालबर्डी येथे जाणाऱ्या नातेवाईक आणि कुटुंबीयांच्या गाडीला हा अपघात झाला. मिळालेल्या माहितीनुसार, वाहन क्रमांक एमएच 14 एझेड 5239 हे प्रवासी वाहन सालबर्डी



जवळील वळणावरून जात असताना चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले, परिणामी गाडी रस्त्याच्या कडेला पलटी झाली. अपघात इतका भीषण होता की गाडीचे मोठे नुकसान झाले व प्रवासी काही अंतरावर फेकले गेले. घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत जखमींना बाहेर काढले आणि मोर्शी उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. परंतु अनेकांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती येथे हलविण्यात आले आहे. सध्या सर्व जखमींवर उपचार सुरू आहेत. या अपघातात चालक सलमान खान याकुब खान (वय 28) हाही गंभीर जखमी झाला आहे. घटनेची माहिती मिळताच मोर्शी पोलिस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले व पंचनामा करून पुढील तपास सुरू केला आहे.

### असे आहेत जखमींची नावे

दिवाकर राऊत (50), सुनील खंडारे (30), राहुल विजय राऊत (27), दिलीप धानोरकर (35), महेश सुधाकर राऊत (30), प्रथमेश पंकज राऊत (10), विजय चंपकराव राऊत (55), सलमान खान याकुब खान (28), संतोश बापुराव राऊत (42), रामराव पंजाब राऊत (40), अनिकेत शाम राऊत (16), नरेंद्र सकारामजी गजबे (67), पंकज राऊत (40) (सर्व रहिवासी पुसदा, ता. वलगाव) अशी जखमींची नावे आहेत.

# 40 मतदान केंद्रांवर पार पडणार नगरपरिषदेचे मतदान

## आदर्श संहितेचे पालन करा - सागर ढवळे



महासागर | प्रतिनिधी

**मोर्शी, ( दि.9 )-** मोर्शी नगर परिषदेच्या निवडणूक प्रक्रीयेत आगामी 2 डिसेंबर रोजी मतदान पार पडणार आहे. एकुण 40 मतदान केंद्रावर मतदान होणार आहे. या निवडणुकीत सर्व उमेदवारांनी आदर्श आचारसंहितेचे पालन करावे असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी सागर ढवळे यांनी केले आहे.



नगर परिषदेच्या सभागृहात पार पडलेल्या बैठकीत सागर ढवळे यांनी सांगितले की, मोर्शी नप च्या निवडणुकीत 32 हजार 874 इतके मतदार मतदानाचा हक्क बजावणार असून एकूण 40 मतदान केंद्रावर मतदान होणार आहे. नगराध्यक्ष पद हे नामाप्र महिलेसाठी राखीव असून मोर्शी नप मध्ये 12 प्रभाग आहेत यामध्ये 24 नगरसेवक राहणार असून 12 महिला प्रतिनिधी प्रतिनिधित्व करणार आहे. 24 वार्डांपैकी अनुसूचित जाती साठी 2, अनुसूचित जमाती साठी 1, नामाप्र 6 व सर्वसाधारण 15 सदस्य राहणार आहे. यापैकी महिला सदस्यां साठी अनुसूचित जाती 1, नामाप्र 3 व सर्वसाधारण महिलेसाठी 8 जागा आरक्षीत आहे. सर्वसाधारण जागेसाठी 1 हजार रुपये अनामत रक्कम राहणार असून अनु.जाती,अनु. जमाती, ना. मागास वर्ग व महिला उमेदवार असेल तर 500 रुपये अनामत रक्कम राहणार आहे. निवडणुकी दरम्यान सर्व पक्ष पदाधिकाऱ्यांनी निवडणूक शांततेत पार पडेल यासाठी सहकार्य करावे, प्रचारा दरम्यान जाती, धर्मा बद्दल बोलू नये व आदर्श आचार संहितेचे पालन करावे असे आवाहन सागर ढवळे निवडणूक निर्णय अधिकारी यांनी केले. याप्रसंगी मोर्शी शहरातील पक्षाचे पदाधिकारी, पत्रकार व निवडणूक विभागाचे कर्मचारी, नगरपरिषदेचे कर्मचारी उपस्थित होते.

# भाजपमध्ये नगराध्यक्षपदासाठी चुरस

**उमेदवारीवरून कुरघोड्या आणि रस्सीखेच!**




महासागर | प्रतिनिधी

**नांदगाव खंडेश्वर, ( दि.9 )-** नांदगाव खंडेश्वर नगर पंचायत निवडणूक जसजशी जवळ येत आहे, तसतसे शहरातील राजकीय वातावरण तापू लागले आहे. नगराध्यक्ष पदासाठी इच्छुक असलेल्या नेत्यांमध्ये चुरस निर्माण झाली असून, उमेदवारीवरून भाजपच्या घरातच रस्सीखेच आणि कुरघोड्या सुरू झाल्या आहेत. परिणामी, पक्षश्रेष्ठींसमोर उमेदवार निवडीचा मोठा पेच निर्माण झाला आहे.

राज्य निवडणूक आयोगाने कार्यक्रम जाहीर केल्यानंतर भाजप मधील अनेक दिग्गज कार्यकर्ते, पदाधिकारी तसेच काही स्वयंघोषित नेते सक्रिय झाले आहेत. सत्ताकाळात निष्क्रीय राहिलेल्या काही जणांनी आता उमेदवारीसाठी हालचालींना वेग दिला आहे. काही महिला पदाधिकारीसुद्धा नगराध्यक्षपदाची उमेदवारी मिळवण्यासाठी प्रयत्नशील असून, पक्षांतर्गत गुप्त बैठकींना आणि लॉबिंगला जोर आला आहे. पक्षांतर्गत सध्या कोणतेही नाव आघाडीवर नसल्याने, पक्षश्रेष्ठींकडून गोपनीयता पाळली जात आहे. मात्र, शहर विकासाला प्राधान्य देणारा, जनतेत लोकप्रिय आणि तरुणाईला आकर्षित करणारा चेहरा उमेदवार म्हणून द्यावा, अशी मागणी कार्यकर्त्यांतून होत आहे.

### यंदा पुन्हा युती होणार का ?

काही स्थानिक नेते आणि माजी पदाधिकारी केवळ आमदारांच्या मागे फिरून स्वत:ची उपस्थिती दाखवत आहेत. चमकोगिरी करणाऱ्यांना तिकीट देऊ नये, अशी टीका कार्यकर्त्यांतून केली जात आहे. पक्षाच्या नावावर आपले घर भरणारे नेते आता पुन्हा उमेदवारीसाठी जोर लावत असल्याची चर्चा रंगली आहे. एकाच जागेसाठी तीन ते चार नावांचा जोर असल्याने भाजपमधील अंतर्गत समीकरणे गुंतागुंतीची बनली आहेत. गटबाजी, जातीय आणि स्थानिक गणितांमुळे उमेदवार निवड भाजपसमोर मोठा पेच ठरत आहे. मागील कार्यकाळात भाजपने राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना (मित्रगट) सोबत सत्ता स्थापन केली होती. आता पुन्हा नगराध्यक्षपदाची माळ भाजपकडे येईल का, याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे. येत्या काही दिवसांत उमेदवारी जाहीर होताच ही राजकीय शर्यत आणखी रंग घेणार, यात शंका नाही.

### राष्ट्रादीचे माजी तालुका अध्यक्ष प्रवीण केने यांचे निधन

**तिवसा -** तिवसा येथील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे माजी तालुका अध्यक्ष प्रवीण विठ्ठलराव केने वय 47 यांचे आज शनिवार ता. 8रोजी सकाळी अमरावती येथील खाजगी रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले ते निर्मल उज्वल बँकेचे पालकसंचालक, निर्मल किड्सचे स्कुलचे सदस्य तसेच स्व.लालसाहेब देशमुख महाविद्यालयात ग्रंथपाल म्हणून कार्यरत होते. ता.3रोजी आपल्या दुचाकीने ते महाविद्यालयात जातं असताना महामार्गावर असलेल्या रामजी हॉटेल नजीक दुचाकी समोर श्वान आडवे आल्याने त्यांचा अपघात झाला होता. या अपघातात त्यांच्या डोक्यासह छातीला गंभीर दुखापत झाल्याने त्यांच्यावर पाच दिवसापासून अमरावती येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरु होते.

# परतवाडा आगारप्रमुख जीवन वानखडे पुन्हा अडचणीत

## आठ महिन्यांत दुसरे निलंबन



महासागर | प्रतिनिधी

**अचलपूर, ( दि.9 ) -** परतवाडा एस.टी. आगाराचे व्यवस्थापक जीवन दत्तात्रय वानखडे पुन्हा एकदा शिस्तभंगाच्या कारवाईत सापडले आहेत. फक्त आठ महिन्यांत हे त्यांचे दुसरे निलंबन असून, यावेळीची कारणे अधिक गंभीर स्वरूपाची मानली जात आहेत.

दोन दिवसांपूर्वी ते ड्युटीवर असताना मद्यधुंद अवस्थेत आढळले. एस.टी. महामंडळाच्या दक्षता विभागाच्या पथकाने त्यांना रंगेहात पकडून पोलिस ठाण्यात ताब्यात दिले. तपासानंतर शनिवारी दुपारी त्यांचे निलंबन आदेश जारी करण्यात आले. या घटनेनंतर त्यांच्या वादग्रस्त कारभारावर पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. वानखडे यांना यापूर्वी 27 फेब्रुवारी 2025 रोजीही निलंबित करण्यात आले होते. त्या वेळी बस आगारातील अनियमितता, तांत्रिक बिघाड आणि कर्मचाऱ्यांच्या तक्रारींवरून ही कारवाई झाली होती. काही महिन्यांनंतर त्यांची पुन्हा नेमणूक परतवाडा आगारात झाली होती. परंतु अल्पावधीतच निष्काळजीपणा आणि अनुशासनभंगाच्या कारणास्तव दुसऱ्यांदा कारवाई झाली आहे. परतवाडा आगारातील बसेस वारंवार बिघडत असल्याने प्रवाशांमध्ये नाराजी होती. एका घटनेत प्रवासादरम्यान बसचे चाक सुटल्याने मोठा अपघात टळला होता. तसेच महिला कर्मचाऱ्यांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष झाल्याचेही तपासात आढळले.

एस.टी. महामंडळाचे विभागीय निरीक्षक निलेश बेलसरे म्हणाले, प्रवाशांच्या सुरक्षेशी संबंधित कोणतीही लापरवाही सहन केली जाणार नाही. दोषी आढळल्यास कठोर कारवाई होईल. या घटनेनंतर परतवाडा आगारात पारदर्शकता आणि शिस्तबद्धतेची अपेक्षा व्यक्त होत असून, वरिष्ठ पातळीवर अंतर्गत कार्यपद्धतीचे पुनर्मूल्यांकन होण्याची शक्यता आहे.

# नांदगाव खंडेश्वर नगर पंचायतीचा स्वच्छता विभाग निद्रिस्त

## शहरातील नाल्यांची नियमित साफसफाई नाही ◆ नागरिकांमध्ये संतापाची लाट

महासागर | प्रतिनिधी

**नांदगाव खंडेश्वर,( दि.9 )-** शहरात डासांच्या प्रादुर्भावामुळे मलेरिया आणि डेंग्यूसारखे आजार वेगाने वाढत असून रुग्णसंख्येत मोठ्या प्रमाणावर वाढ होत आहे. नगर पंचायतीच्या स्वच्छता विभागाचे नियंत्रण सुटल्याने डासांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे, त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला आहे.

शहरातील नाल्यांची साफसफाई नियमित होत नाही. अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढीग साचलेले असून, त्यातून डासांची पैदास वाढत आहे. नगर पंचायतीने आजवर कोणतीही ठोस प्रतिबंधक उपाययोजना केली नसल्याने नागरिक त्रस्त आहेत. डासांच्या चाव्यामुळे डेंग्यू, हिवताप, हत्तीपाय, ब्रेन ट्यूमर यांसारख्या जीवघेण्या आजारांचा धोका वाढत आहे. शासकीय आणि खासगी



रुग्णालयांमध्ये रुग्णांची संख्या झपाट्याने वाढत असून परिस्थिती गंभीर बनली आहे. तज्ज्ञांच्या मते, योग्य वेळी उपाय न केल्यास शहरात रोगराईचे प्रमाण अधिक वाढू शकते. त्यामुळे नगर पंचायतीने तातडीने नाल्यांची नियमित साफसफाई करून फॉगिंग मशीनद्वारे प्रतिबंधक औषधांची फवारणी करणे आवश्यक आहे. नागरिकांनी नगर पंचायतीच्या दुर्लक्षाबद्दल रोष व्यक्त करत म्हटले आहे की, शहरातील काही भागातील नाल्या तुंबल्या असून डासांची पैदास प्रचंड वाढली आहे, मात्र प्रशासन अजूनही गाढ झोपेत आहे. शहरातील वाढती घाण आणि नाल्यांकडे दुर्लक्ष यामुळे रोगराईचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे नगर पंचायतीच्या आरोग्य विभागाने तातडीने कारवाई करून शहर स्वच्छ व रोगमुक्त करण्याची मागणी शहरवासीयांनी केली आहे.

> शहरामध्ये दैनंदिन साफसफाई व नाली सफाईची कामे प्रभागनिहाय व्यवस्थितपणे सुरू आहे. त्याचप्रमाणे मागील महिन्यात पूर्ण शहरात फॉगिंग व फवारणी करण्यात आली होती आणि आता सध्या स्थितीत पूर्ण शहरात प्रभाग निहाय फवारणी सुरू आहे.
>
> **पी.एन.सोनटक्के , स्वच्छता निरीक्षक, न प.नांदगाव खंडेश्वर.**



### किशोर अब्रुक यांची राष्ट्रवादी काँग्रेस तालुका अध्यक्षपदी नियुक्ती

**अंजनगाव बारी-** राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) अमरावती तालुका अध्यक्षपदी प्राध्यापक किशोर अब्रुक यांची नियुक्ती करण्यात आली. अब्रुक हे अमरावती तालुक्यातील उच्चशिक्षित, मनमिळाऊ आणि सर्वांच्या परिचयाचे व्यक्तिमत्व असून त्यांची ही दुसऱ्यांदा तालुका अध्यक्षपदी निवड झाली आहे. त्यांच्या नियुक्तीचे सर्वत्र अभिनंदन होत असून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. नुकतेच सरपंच संघटनेतर्फे त्यांचा सत्कार जिल्हाध्यक्ष गुलाम नबी इंदलेकर यांच्या उपस्थितीत करण्यात आला. त्यांच्या नियुक्तीमुळे कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून पक्ष अधिक बळकट करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.



# कर भरणाऱ्या नागरिकांना सोडत द्वारे मिळणार विविध बक्षिसे

## ग्रामपंचायत पार्डीचा उपक्रम

महासागर | प्रतिनिधी

**मोर्शी ( दि.9 )-** तालुक्यातील पार्डी येथे दि. 6 नोव्हेंबर 2025 रोजी मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत विशेष कार्यशाळा आयोजित करण्यात आली. यामध्ये गावात अभियान राबविण्यासाठी नागरिकांचा सहभाग कसा वाढेल व शासनाच्या सर्व योजनाचा लाभ घेण्यासाठी मोर्शी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी स्वप्नील मगदूम यांनी मार्गदर्शन केले.



बचत गट मधून रोजगार निर्मिती साठी वडे मॅडम यांनी मार्ग दर्शन केले. यावेळी ग्रामपंचायत पार्डी तर्फे संपूर्ण कर भरणाऱ्या नागरिकांना सोडत द्वारे विविध बक्षिसे देणाऱ्या योजनेचा शुभारंभ करण्यात आला.

सोडत द्वारे टीव्ही, फ्रिज, स्प्रे पंप, मिक्सर, सेलिंग फॅन, सोलर लाईट, कूलर, चार्जिंग लाईट अश्या वस्तूंचे वाटप करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत सर्व कामे करून गावाला प्रथम पारितोषिक मिळेल असा आत्मविश्वास गावाचे उपसरपंच प्रवीणभाऊ ठवळी यांनी व्यक्त केला. यावेळी गावच्या सरपंच वर्षा वानखडे, सचिव माधुरी फुटाणे, सर्व ग्राम पंचायत सदस्य, बचत गट महिला व गावातील नागरिक उपस्थित होते.

### ज्येष्ठ स्वयंसेवक भिमराव शेंडे यांचे निधन

**धामणगाव रेल्वे-** आसेगाव येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ स्वयंसेवक भिमराव कानुजी शेंडे (वय 93) यांचे रविवारी (दि. 9 नोव्हेंबर) दुपारी 4 वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने परिसरात शोककळा पसरली आहे.



शेंडे हे अनेक वर्षांपासून संघाशी जोडलेले होते. सेवाभावी व शिस्तप्रिय व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ओळख होती. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुलं व नातवंडे असा परिवार आहे. त्यांचा एक मुलगा शेती व्यवसायात असून दोन मुलं भारतीय सेनेत कार्यरत आहेत. अंत्यसंस्कार उद्या दि. 10 नोव्हेंबर रोजी सकाळी 11.30 वाजता आसेगाव येथे पार पडणार आहेत.

# शिवाजी शाळेत एआय लॅबचे उद्घाटन



महासागर | प्रतिनिधी

**मोर्शी, ( दि. 9 ) -** श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती संचालित शिवाजी उच्च माध्यमिक शाळा, मोर्शी येथे कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) ॲक्टिव्हिटी लॅबचे उद्घाटन करण्यात आले.

अलीकडेच सातारा येथील कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात झालेल्या प्रशिक्षणात शाळेतील शिक्षक राहुल घुलक्षे आणि रोहित चौधरी यांनी सहभाग घेतला होता. त्यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेत एआय लॅबची स्थापना करण्यात आली आहे. या लॅबमध्ये एकावेळी 25 विद्यार्थी संगणकावर बसून एआय विषयाचे धडे घेऊ शकतात. लॅबचे उद्घाटन मुख्याध्यापक श्रीकांत देशमुख यांच्या हस्ते झाले. यावेळी उपमुख्याध्यापक मिलिंद ढाकुलकर, पर्यवेक्षक विठ्ठल नवरे, शिक्षक प्रतिनिधी अशोक चौधरी आणि शिक्षकेतर प्रतिनिधी विठ्ठल गवई उपस्थित होते. नवीन एआय लॅब सुरू झाल्याने विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# धारणीत अनधिकृत पॅथलॉजी लॅब

## ◆ रुग्णांच्या जीवाशी खेळ ◆ प्रशासनाचे दुर्लक्ष

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती ,( दि.9 ) -** जिल्ह्यातील आदीवासी बहुल धारणी शहरात अनेक वर्षांपासून कोणत्याही कायदेशीर परवान्याशिवाय व प्रमाणपत्रांशिवाय रक्तचाचणी प्रयोगशाळा चालवल्या जात असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या बोगस लॅबमधून रक्त तपासणीचा चुकीचा अहवाल देऊन रुग्ण आणि डॉक्टर दोघांचीही दिशाभूल केली जात आहे, हा सरळ रुग्णांच्या जीवाशी खेळ केला जात असल्याने, यावर




प्रशासनाने तातडीने कारवाई करणे गरजेचे झाले आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, या लॅब चालकांकडे डीएमएलटी, पीजी डीएमएलटी किंवा बीएमएलटी सारख्या अधिकृत वैद्यकीय प्रयोगशाळा तंत्रज्ञानाच्या डिप्लोमा किंवा पदवीचे प्रमाणपत्र नाही. या लॅबचे महाराष्ट्र युनिवर्सीटी ऑफ हेल्थ सायन्स किंवा महाराष्ट्र पॅरासिटामॉल कौन्सील मुंबई मध्ये कोणतेही नोंदणी झालेले नाही. तरीसुद्धा मागील 5 ते 7 वर्षांपासून येथे रुग्णांची अवैध तपासणी केली जात आहे.

यातील अनेक जण खासगी संस्थांकडून केवळ वीस हजार रुपये देऊन 'डमी आणि अनधिकृत डीएमएलटी डिप्लोमा'मिळवून या व्यावसायात उतरले असल्याची माहिती समोर आली आहे. या लॅबमधून पॉझिटिव्ह रुग्णांना निगेटिव्ह आणि निगेटिव्ह रुग्णांना पॉझिटिव्ह अहवाल देत त्यांच्या जीवाशी खेळ केल्या जात आहे.

### प्रशासनाविषयी संताप

इतका गंभीर प्रकार उघडकीस येऊनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. रुग्णांच्या जीवाशी संबंधित प्रकरणात प्रशासन इतके निष्क्रिय का आहे? असा सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे. या बोगस लॅबकडून काही अधिकाऱ्यांना 'हसे' मिळत असल्यानेच कारवाई टाळली जात आहे का? असा संशय नागरिकांकडून व्यक्त करत स्थानिक प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. याप्रकरणी तपासणी करुन बोगस लॅबवर तातडीने सील ठोकून दोषींवर फसवणूक आणि जीवाशी खेळल्याबद्दल कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. अशी मागणी केली जात आहे.

### जाहिरात

जन्म प्रमाण पत्र मिळणे बाबत श्री लक्ष्मण आत्माराम पाटोरकर रा. चिखली ता. चिखलदरा यांचा जन्म दिनांक 01/4/1968 रोजी गाव टाकरखेडा ता. धारणी येथे झालेला आहे. या बाबत ग्राम पंचायतमध्ये नोंद नाही परंतु यांना जन्म दाखल्याची आवश्यकता आहे. करिता कोणाला या बाबत आक्षेप असल्यास त्यांनी 30 दिवसात आक्षेप दाखल करावे. सदर प्रसिद्धी ग्रामपंचायत दिया, ता. धारणी येथे नोटीस बोर्ड वर लावण्यात आली आहे.

**लक्ष्मण आत्माराम पाटोरकर**

RNINO-46975/1985 Dainik Mahasagar Amravati

Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak; printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Hotel Tourist Beside Railway Station square, Amravati. Amravati head office, address: Dainik Mahasagar, Hotel Tourist beside Railway Station square, Amravati, phone no. 9518934504.
Group Editor-in-Chief and Managing Director- Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, हॉटेल टुरिस्टच्या बाजूला, रेल्वे स्टेशन चौक, अमरावती, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक




# हृदयविकाराचे आधीच मिळतात संकेत

आजकाल इतक्या कमी वयात लोकांना हार्ट अटॅक का येतो? फिट, हेल्दी दिसणारे लोकही क्षणार्धात कोसळतात. आज अनेक तरुणांनाही हार्ट अटॅक येतो आणि काहीजण आपला जीव गमावतात, पण हार्ट अटॅक कधीच अचानक येत नाही.

जागतिक आरोग्य संघटनेनुसार, दरवर्षी सुमारे एक कोटी ७९ लाख लोक लोक हार्ट अटॅकने मृत्युमुखी पडतात. अनेकांना वाटते, की हार्ट अटॅक अचानक येतो आणि त्याची कोणतीही पूर्वसूचना मिळत नाही. पण हे खरे नाही. एका संशोधनानुसार बहुतांश हृदयरोग हळूहळू वाढत जातात आणि त्यांची चिन्हे आधीच शरीरात दिसू लागतात.

**हृदयरोगाचे संकेत वेळीच ओळखा**

दक्षिण कोरिया आणि अमेरिकेतील संशोधकांनी केलेल्या अभ्यासानुसार, हार्ट अटॅक किंवा स्ट्रोक आलेल्या ९९ टक्के लोकांमध्ये काही वर्षांपूर्वीच लक्षणे दिसत होती. त्यात उच्च रक्तदाब, साखरेचे प्रमाण वाढणे, कोलेस्ट्रॉल जास्त असणे किंवा धूम्रपानाची सवय ही मुख्य धोक्याची चिन्हे होती. डॉक्टर सांगतात, या छोट्या पण महत्त्वाच्या लक्षणांकडे दुर्लक्ष केल्यास धोका वाढतो.

जाणून घ्या
डॉ. अजिंक्य बोऱ्हाडे

**हार्ट अटॅकपूर्वी शरीर देते हे संकेत**

* सतत थकवा जाणवणे किंवा ऊर्जेचा अभाव
* छोटे काम केल्यावरही श्वास लागणे
* छातीत फडफड किंवा हृदयाचे ठोके अनियमित होणे



* वारंवार छातीत जळजळ, अपचन
* उच्च रक्तदाब, कोलेस्ट्रॉल
* चालताना पायात गोळे येणे किंवा वेदना.
* जबडा, हात किंवा छातीत घट्टपणा
* अचानक घाम येणे किंवा चिंताग्रस्त वाटणे

**हार्ट अटॅक अचानक का येत नाही?**

संशोधकांनी नव्वद लाखांहून अधिक दक्षिण कोरियन आणि हजारो अमेरिकन लोकांवर वीस वर्षांचा अभ्यास केला. निष्कर्ष असाच निघाला की, हार्ट अटॅक येण्यापूर्वी शरीरात एक तरी संकेत आधी दिसतोच. अगदी रक्तदाब थोडा वाढला, साखर किंचित जास्त झाली किंवा कोलेस्ट्रॉल वाढले, तरीही ते हृदयरोगाचा संकेत मिळू शकतो. रक्तदाब, शुगर किंवा कोलेस्ट्रॉल थोडे वाढले तरी दुर्लक्ष करू नका. वेळेवर टेस्ट आणि उपचार केल्यास धोका कमी होतो.

**हार्ट अटॅकची मुख्य कारणे**

हार्ट अटॅक एका कारणामुळे होत नाही. त्यासाठी धूम्रपान, व्यायामाचा अभाव, जास्त तेलकट किंवा गोड पदार्थ, ताण-तणाव, अपुरी झोप आणि उच्च रक्तदाब ही मुख्य कारणे आहेत. यापैकी एक-दोन सवयींचाही हृदयावर विपरीत परिणाम होतो आणि रक्तवाहिन्यांत गुठळ्या होऊ लागतात.

**हार्ट अटॅकपासून बचाव कसा कराल?**

* नियमित आरोग्य तपासणी करा
* रक्तदाब, साखर, कोलेस्ट्रॉल तपासत राहा
* आरोग्यदायी आहार घ्या, धूम्रपान टाळा. दररोज थोडा व्यायाम करा
* ताण कमी ठेवा झोप घ्या

# डेंगीचा यकृतावर परिणाम




पावसाळा संपला आहे; पण डेंगीचा धोका पूर्णपणे नाहीसा झालेला नाही. हा विषाणू आपल्या शरीरावर हल्ला करतो आणि त्याचा रक्तातील प्लेटलेट्सवर सर्वाधिक परिणाम होतो. त्यांची संख्या कमी होत असताना, लोकांना अशक्तपणा, थकवा आणि रक्तस्राव यासारख्या समस्या येऊ लागतात; पण डेंगी केवळ प्लेटलेट्सवरच परिणाम करत नाही, तर तो आपल्या यकृतालाही हानी पोहोचवू शकतो.

अनेक प्रकरणांमध्ये डेंगी यकृताचे नुकसान करू शकतो. गेल्या काही दिवसांत डेंगीच्या रुग्णांची संख्या वाढली आहे. यापैकी बहुतेक लोक तापानंतर बरे होतात; परंतु अनेकांना यकृताच्या समस्या जाणवतात डेंगीमुळे यकृताच्या पेशींचे लक्षणीय नुकसान होते. ही समस्या विशेषतः रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत असणाऱ्या किंवा आधीच यकृताचा आजार असणाऱ्या रुग्णांमध्ये दिसून येते. डेंगी विषाणू शरीरात प्रवेश करून पेशींना नुकसान पोहोचवत असल्याने यकृताची जळजळ होते.

व्याधी विकार
डॉ. कुंदन गायकवाड

**डेंगीमध्ये यकृताचा सहभाग**

वैद्यकीय संशोधनातून असे दिसून आले आहे, की डेंगीमध्ये यकृताचा सहभाग सामान्य आहे. त्यात कावीळ, पोटदुखी, वाढलेले यकृत आणि वाढलेले यकृत एंझाइम यांचा समावेश आहे. डेंगीदरम्यान तुम्हाला ही लक्षणे आढळली तर तुम्ही ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. सतत जादा ताप आणि पोटदुखी, पिवळे डोळे आणि त्वचा, भूक न लागणे आणि उलट्या, पोटात सूज येणे किंवा जडपणा जाणवणे. वाढलेला थकवा आणि अशक्तपणा, रक्ताच्या उलट्या होणे किंवा लघवीत रक्त येणे या गोष्टी लक्षात ठेवा. डेंगीचा त्रास होत असेल, तर तुम्हाला धोका आहे की नाही हे ठरवण्यासाठी तुम्ही डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार रक्त तपासणी नक्की करून घ्यावी. दुसरी सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे भरपूर पाणी पिणे आणि शक्य तितके द्रवपदार्थ पिण्याचा प्रयत्न करणे. याव्यतिरिक्त तळलेले आणि मसालेदार पदार्थ पूर्णपणे टाळावेत. तुमच्यासाठी पचण्यास कठीण असलेले सर्व टाळावे.

# फुफ्फुसाच्या संसर्गामुळे श्वसनविकार

फुफ्फुसांचा संसर्ग म्हणजे जीवाणू, विषाणू किंवा बुरशीमुळे फुफ्फुसांमध्ये जळजळ किंवा संसर्ग होणे. हा संसर्ग फुफ्फुसांच्या कार्यावर परिणाम करतो आणि त्यामुळे श्वसनाच्या समस्या उद्भवू शकतात. प्रतिकारशक्ती कमी असलेले लोक, वृद्ध, लहान मुले आणि मधुमेह किंवा जुनाट आजार असलेल्या लोकांना याचा सर्वाधिक धोका असतो.

धूम्रपान करणारे आणि वारंवार प्रदूषित हवेच्या संपर्कात येणाऱ्यांनाही याचा धोका असतो. फुफ्फुसांचे संक्रमण अनेक कारणांमुळे होऊ शकते. सर्वात सामान्य कारण म्हणजे सर्दी, फ्लू किंवा इतर श्वसन आजारादरम्यान फुफ्फुसांमध्ये पोहोचणाऱ्या बॅक्टेरिया आणि विषाणूंचा हल्ला. शिवाय, कमी प्रतिकारशक्ती, धूम्रपान, प्रदूषित वातावरणाचा संपर्क आणि दीर्घकाळ खोकला किंवा घशाच्या समस्या यामुळेदेखील संसर्गाचा धोका वाढतो. मधुमेह, हृदयरोग किंवा दमा यासारखे जुनाट आजार असलेल्या काही लोकांमध्ये संसर्ग अधिक गंभीर असू शकतो. फुफ्फुसांची अस्वच्छता आणि खराब आहारदेखील धोका वाढवतो. म्हणून, लक्षणे दिसू लागताच त्वरित लक्ष देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. फुफ्फुसांच्या संसर्गाची लक्षणे सौम्य किंवा गंभीर असू शकतात. सुरुवातीच्या लक्षणांमध्ये अनेकदा सतत खोकला, श्लेष्मा किंवा कफ, सौम्य ताप, थकवा आणि श्वास घेण्यास त्रास होणे यांचा समावेश असतो. काही प्रकरणांमध्ये, छातीत दुखणे, उच्च ताप, हाडे किंवा स्नायू दुखणे, शिंका येणे किंवा घशात जळजळदेखील होऊ शकते. गंभीर संसर्गांमध्ये श्वास घेण्यास त्रास होणे, जलद श्वास घेणे, निळसर किंवा फिकट चेहरा आणि सतत उच्च ताप येणे यांचा समावेश असू शकतो. जर ही लक्षणे दिसली तर तुम्ही ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, कारण संसर्ग फुफ्फुसांच्या कार्यावर परिणाम करू शकतो आणि जीवघेणा बनू शकतो.

धोका ओळखा
डॉ. अभिजीत दिवटे



**प्रतिबंधात्मक टिप्स**

* मास्क घाला आणि प्रदूषित किंवा गर्दीच्या ठिकाणी टाळा.
* खोकताना किंवा शिंकताना वारंवार हात धुवा आणि रुमाल किंवा कोपर वापरा.
* धूम्रपान आणि सिगारेटपासून दूर राहा.
* तुमची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यासाठी संतुलित आणि पौष्टिक आहार घ्या.
* वेळेवर लसीकरण करा, जसे की फ्लू किंवा न्यूमोकोकल लस.
* तुमच्या घरात आणि परिसरातील हवा स्वच्छ ठेवा आणि वायुवीजनाकडे लक्ष द्या.

# बदलते हवामान दमेकऱ्यांना घातक

बदलत्या हवामानामुळे दम्याच्या रुग्णांना धोका वाढतो. दमा हा फुफ्फुसांचा एक जुनाट आजार आहे. त्यामुळे श्वसनमार्गात जळजळ आणि अरुंदता येते. श्वास घेण्यास त्रास होणे, खोकला येणे, छातीत घट्टपणा येणे आणि शिट्टी वाजणे ही सामान्य लक्षणे आहेत.

अति थंडी किंवा उष्णता, धूळ, परागकण आणि प्रदूषण दमा निर्माण करू शकते. बदलत्या हवामानात हवेतील आर्द्रता, थंडी किंवा उष्णतेतील अचानक बदल दम्याच्या रुग्णांसाठी आव्हानात्मक असू शकतात. या घटकांमुळे रुग्णांमध्ये श्वास घेण्यास त्रास, सतत खोकला आणि छातीत घट्टपणा वाढू शकतो. हा आजार कोणत्याही वयात होऊ शकतो; परंतु त्याचे परिणाम मुले आणि वृद्धांमध्ये अधिक तीव्र असतात.

**बदलत्या हवामानात दम्याच्या रुग्णांनी कशी काळजी घ्यावी?**

बदलत्या हवामानात दम्याच्या रुग्णांनी सावधगिरी बाळगणे अत्यंत महत्त्वाचे आहे. प्रथम, तुमची औषधे आणि इन्हेलर नियमितपणे वापरा आणि डॉक्टरांनी सांगितलेल्या डोसमध्ये घ्या. हवामानानुसार घरचे वातावरण स्वच्छ आणि धूळमुक्त ठेवा. थंड वारा किंवा पावसात बाहेर जाणे टाळा आणि आवश्यक असल्यास मास्क घाला. व्यायाम आणि योगामुळे फुफ्फुसांची क्षमता सुधारते; परंतु हवामानानुसार मध्यम व्यायाम करा. हिवाळ्यात खोलीत आर्द्रता राखा आणि उन्हाळ्यात हवेशीर रहा.



घ्या काळजी
डॉ. कुंदन गायकवाड

अचानक खोकला किंवा श्वास घेण्यास त्रास होत असेल, तर ताबडतोब आपत्कालीन सेवांशी संपर्क साधा. दमा नियंत्रणात ठेवण्यासाठी नियमित तपासणी आणि फुफ्फुसांच्या कार्य चाचण्या आवश्यक आहेत.

**उपाय**

* धूळ, धूर आणि प्रदूषण टाळा.
* थंड हवेत बाहेर जाताना स्वच्छ कपडे आणि शाल घाला.
* घराची नियमित स्वच्छता आणि वायुवीजन सुनिश्चित करा.
* धूम्रपान आणि धुराच्या ठिकाणांपासून दूर राहा. खोकला, रक्तसंचय किंवा श्वास घेण्यास त्रास होत असेल तर ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्या.

# आरोग्यदायी मसाले

दालचिनीचा वापर पदार्थांची चव दृष्टीनं वाढवतो. दालचिनी हा सुगंधी मसाल्याचा प्रकार. रस्सेदार भाज्या, पुलाव तसंच गोड पदार्थांमध्येही दालचिनी घातली जाते. ही दालचिनी मधुमेहींसाठी वरदान ठरू शकते, असं एका संशोधनातून समोर आलंय. शरीर इन्सुलिनचा प्रतिकार करत असेल तर दालचिनीमुळे याला आळा बसू शकतो. म्हणजेच मधुमेह नियंत्रणात दालचिनी महत्त्वाची भूमिका बजावते. तसंच अपचन, सर्दी, जुलाब, रक्ताभिसरणाते येणारे अडथळे यावरही दालचिनी उपयुक्त ठरते.

* लवंग हा असाच एक औषधी पदार्थ. दातांच्या समस्यांवर लवंगाचा वापर हमखास केला जातो. बॅक्टेरियामारक गुणधर्मांमुळे दातदुखीत दाढेखाली लवंग ठेवण्याचा सल्ला दिला जातो. जास्त जेवण झाल्यानंतर अस्वस्थ वाटत असेल तर लवंगेमुळे आराम पडतो. उलट्या, जुलाब, अपचन, पचनसंस्थेतील बिघाड यावर लवंग हा रामबाण उपाय ठरू शकतो.
* जिऱ्यामुळे फोडणीची लज्जत अधिक वाढते. हे साधंसं जीरं अनेक रोगांवरचं औषध ठरू शकतं. पचनसंस्थेच्या तक्रारी, ॲनिमिया आणि सर्दी यावर जीरं लाभदायक ठरतं.



मूळव्याधीची समस्या दूर करण्याचे आश्चर्यकारक गुणधर्म जीऱ्यात असतात. जीऱ्यामुळे शरीराला लोह आणि मँगनिज ही खनिजं मिळतात. यामुळे हाडांमध्ये कॅल्शियम शोषलं जातं. तसंच रक्तदाबही नियंत्रणात राहतो.

* बिर्याणी, पुलावची लज्जत वाढवणारी मसाल्याची मोठ्या आकाराची वेलचीही आरोग्यदायी आहे. पचनाच्या तक्रारी तसंच गॅसच्या समस्या असल्यास या वेलचीचं सेवन करावं. गळ्याच्या तक्रारी, छातीत कफ जमणे, दाढ दुखणं या समस्यांवरही मसाल्याची वेलची प्रभावी ठरते.
* केशरात अनेक आरोग्यदायी गुणधर्म असतात. नैराश्य, दृष्टिदोष, विस्मरण यावर केशर प्रभावी ठरतं. पचनाच्या तक्रारींवरही केशर उपकारक आहे. गॅस, बद्धकोष्ठता या तक्रारी दूर करण्याची क्षमता काळ्या मिरीत असते. यात बॅक्टेरियाविरोधी गुणधर्म असतात. रक्तदाब नियंत्रणावर काळीमिरीचा वापर होतो. यात भरपूर प्रमाणात लोह असतं.

आरोग्य चर्चा

# स्लिप्ड डिस्कविषयी...

आपल्या पाठीचा कणा विविध प्रकारच्या हाडांनी बनलेला असतो. ही हाडं एकमेकांमध्ये गुंतलेली असतात. त्यांना डिस्क म्हणजे चकतीचं आवरण असतं. चालताना, धावताना तसंच दैनंदिन कामं करताना बसणारे धक्के सहन करून हाडांचं रक्षण करण्याची जबाबदारी या चकत्यांची असते. प्रत्येक चकतीचे दोन भाग असतात. मुलायम, निसरडा असा आतला भाग आणि टणक असा बाहेरचा भाग. दुखापत किंवा अशक्तपणामुळे चकतीचा आतला भाग बाहेरच्या भागाला भेदून पुढे ढकलला जातो. यालाच स्लिप्ड डिस्क असं म्हणतात. यामुळे वेदना आणि अस्वस्थता जाणवते. स्लिप्ड डिस्कमुळे पाठीच्या कण्याची एखादी नस दाबली गेली तर आसपासच्या भागात वेदना जाणवतात. तो भाग बधीरही होतो. या विकाराची तीव्रता अधिक असेल तर शस्त्रक्रिया करून स्लिप्ड डिस्कवर उपचार केले जातात.

व्याधी विचार

**लक्षणं जाणून घ्या**

स्लिप्ड डिस्क पाठीच्या कण्याच्या कोणत्याही भागात होऊ शकते. मानेपासून पाठीच्या खालच्या भागापर्यंत कुठेही हा त्रास जाणवू शकतो. त्यातही पाठीच्या खालच्या भागात स्लिप्ड डिस्क होण्याची शक्यता बरीच जास्त असते. शरीराच्या एका बाजूला जाणवणाऱ्या वेदना आणि बधिरता त्रास देते. स्लिप्ड डिस्कमुळे होणाऱ्या वेदना हात आणि पायांपर्यंत जाणवतात. रात्री जास्त वेदना जाणवणं किंवा विशिष्ट प्रकारची हालचाल केल्यावर




वेदना होणं, उभं राहिल्यावर किंवा बसल्यावर वेदनांची तीव्रता वाढणं, थोडं अंतर चालल्यानंतर वेदना जाणवणं, स्नायूंमध्ये अशक्तपणा जाणवणं ही स्लिप्ड डिस्कची सर्वसाधारण लक्षणं आहेत. ही लक्षणं व्यक्तीगणिक बदलतात.

**का उद्भवते समस्या?**

पाठीच्या कण्याच्या चकतीचा बाहेरचा भाग कमकुवत झाल्याने आतला भाग त्यातून बाहेर पडतो तेव्हा हा त्रास होतो. वाढतं वय हे यामागचं महत्त्वाचं कारण असू शकतं. काही हालचालींमुळेही हा त्रास होऊ शकतो.

# ऑटोइम्युन आजार आणि महिला

भारतात ऑटोइम्यून आजार असलेल्या एकूण रुग्णांपैकी सुमारे ७० टक्के रुग्ण महिला आहेत. त्या २० ते ५० वयोगटातील आहेत. हार्मोनल आणि जीवनशैलीचे घटक सर्वात जास्त सक्रिय असतात. शरीराची संरक्षण प्रणाली, जी सामान्यतः संसर्गांपासून संरक्षण करते, चुकून स्वतःच्या ऊतींवर हल्ला करते, तेव्हा ऑटोइम्यून विकार उद्भवतात. सामान्य आजारांमध्ये ऱ्हुमेटॉइड आर्थ्राइटिस, ल्युपस, थायरॉइडायटिस, सोरायसिस आणि स्जोग्रेन्स सिंड्रोम यांचा समावेश आहे. हे आजार सांधे, त्वचा, रक्तवाहिन्या आणि हृदय किंवा फुफ्फुसांसारख्या अंतर्गत अवयवांवर परिणाम करू शकतात. महिला अनेकदा उशिरा तक्रार नोंदवतात. कारण त्या सातत्याने लक्षणांकडे दुर्लक्षित करतात. अनुवांशिक रचना, प्रजनन वयात आणि बाळंतपणानंतर हार्मोनल बदल, ताणतणाव, लठ्ठपणा आणि पौष्टिक कमतरता यामुळे त्यांना स्वयंप्रतिकार रोग होण्याची शक्यता जास्त असते. दर आठवड्याला, मी अशा महिलांना भेटतो, ज्यांना निदान होण्यापूर्वी वर्षानुवर्षे अस्पष्ट सांधेदुखी किंवा सूज येत आहे. अनेक महिला त्यांच्या ३० किंवा ४० च्या वयोगटातल्या आहेत.




आपण कुठे चुकतो
डॉ. मेघा पटारे

# फ्लूकडे दुर्लक्ष नको

फ्लू हा सर्वसाधारण विकार आहे. तो हंगामी विषाणूंमुळे होतो. यात सौम्य ते तीव्र स्वरूपाची लक्षणं दिसून येतात. काही रुग्ण आठवडाभरात बरे होतात तर काही रुग्णांमध्ये बरीच गुंतागुंत निर्माण होऊ शकते. ६५ वर्षांपुढच्या रुग्णांमध्ये गुंतागुंतीची शक्यता बरीच जास्त असते. ज्येष्ठ नागरिकांची रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत झालेली असते. कमकुवत प्रतिकारशक्तीमुळे शरीर विषाणूंना प्रतिकार करू शकत नाही. फ्लूचा संसर्ग वाढला तर त्याचं रूपांतर निमोनियात होऊ शकतं. निमोनिया झालेल्या रुग्णाला रुग्णालयात दाखल करावं लागतं. म्हणूनच ज्येष्ठ नागरिकांनी आरोग्याची विशेष काळजी घ्यायला हवी.

फ्लू आणि सर्वसामान्य सर्दी यात फरक असतो. आजारी पडल्यानंतर फ्लू आणि सर्दी यातला फरक जाणून घेणं गरजेचं असतं. फ्लू आणि सर्दी यांची लक्षणं सारखीच असली तरी सर्दीची लक्षणं बरीच सौम्य असतात तर फ्लूची बरीच लक्षणं साध्या सर्दीत दिसून येत नाहीत.

**फ्लू आणि सर्दीची लक्षणं**

नाक गळणं, छातीत कफ साठणं,




आरोग्यवेध

घसा दुखणं, खोकला ही सर्दी आणि फ्लूची सर्वसाधारण लक्षणं आहेत. फ्लू असेल तर अतिरिक्त लक्षणं दिसून येतात. त्यात ताप, अंगदुखी, थंडी, थकवा, अशक्तपणा, अस्वस्थता जाणवणं, तीव्र डोकेदुखी यांचा समावेश आहे. ६५ वर्षांपेक्षा अधिक वयाच्या लोकांना ही लक्षणं जाणवली तर पुढची गुंतागुंत टाळण्यासाठी त्यांनी तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्यायला हवा.

नवसंशोधन


## ...म्हणून लोक पत्करतात धोका!



काही लोक धोके पत्करतात. धाडसी खेळ खेळतात. दुसरीकडे काहींना उंचावर जाण्याचीही खूप भीती वाटते. मेंदूतल्या विशिष्ट प्रकारच्या पेशींमुळे असं होतं ही बाब एका संशोधनातून समोर आली आहे. ओएलएम नावाच्या या पेशी धोका पत्करण्याच्या मानसिकतेत महत्त्वाची भूमिका बजावतात. हा शोध अस्वस्थता, चिंता, काळजी, नैराश्य यांसारख्या मानसिक विकारांवरील उपचारांसाठी मैलाचा दगड ठरेल, अशी अपेक्षा आहे.

दंतारोग्य

## कारणं श्वासाच्या दुर्गंधीची




वैद्यकीय भाषेत श्वासाच्या दुर्गंधीला 'हॅलीटोसिस' असं म्हटलं जातं. तोंडाची आणि दातांची अस्वच्छता हे तोंडाच्या दुर्गंधीचं महत्त्वाचं कारण आहे. दातांमध्ये अडकलेल्या अन्नकणांवर बॅक्टेरिया वाढतात. या बॅक्टेरियांमुळे तोंडाला दुर्गंधी येते. तोंड कोरडं पडणं हे सुद्धा तोंडाच्या दुर्गंधीचं कारण आहे. हिरड्यांशी संबंधित विकारांमुळेही तोंडाला दुर्गंधी येते. त्यामुळे तोंडाच्या दुर्गंधीचं कारण जाणून घेऊन त्यावर योग्य ते उपचार करायला हवेत.

डोळ्यांचं आरोग्य

## डोळ्यांना दुखापत झाल्यास....

डोळा हा आपल्या शरीराचा अत्यंत नाजूक असा अवयव आहे. त्यामुळे डोळ्याला होणारी कोणतीही दुखापत किंवा संसर्ग गंभीर स्वरूपाचा असू शकतो. डोळ्याला दुखापत झाली की तातडीने औषधोपचार व्हायला हवेत. यामुळे संभाव्य नुकसान टळू शकतं. डोळा दुखणं, सतत पाणी येणं, डोळे लाल होणं, पापण्या सुजणं ही डोळ्याला दुखापतीची लक्षणं आहेत. त्यामुळे डोळ्यांना दुखापत झाली की तातडीने डॉक्टरांकडे जायला हवं.



आजीबाईचा बटवा

## प्रथिनयुक्त पालक



आहारात प्रथिनांचा समावेश करायला हवा. अंडी, मांस आणि मासे हे प्रथिनांचे उत्तम स्रोत आहेत. शाकाहारींसाठीही प्रथिनं मिळवण्याचे बरेच पर्याय आहेत. त्यापैकी एक म्हणजे पालक. पालकामध्ये भरपूर प्रमाणात प्रथिनं असतात. यासोबतच त्यात भरपूर लोह, जीवनसत्त्व, खनिजं आणि अँटिऑक्सिडंट्स असतात. त्यामुळे आहारात पालकाचा समावेश करायला हवा.

# वाकडीच्या शेतमजूर कन्येची थेट दिल्लीत उत्तुंग भरारी

■ महासागर प्रतिनिधी
गडचिरोली, दि. ९ :

परिस्थिती माणसाला घडवते, या उक्तीचा प्रत्यय चार्मोशी तालुक्यातील वाकडी या छोट्याशा गावातील एका शेतमजूर कन्येने आणून दिला आहे. घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची, आई-वडील दोघेही भूमिहीन शेतमजूर; पण शिक्षणाची प्रचंड आवड आणि समाजात काहीतरी करून दाखवण्याची जिद्द, याच जोरावर शारदा रवींद्र दुगुनलावार हिने देशातील नामांकित शिव नाडर युनिव्हर्सिटी, दिल्ली (एनसीआर) येथे एमए इन रुरल मॅनेजमेंट या प्रतिष्ठेच्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळवला आहे. विशेष म्हणजे, या शिक्षणासाठी तिला तब्बल ११ लाखांची शिष्यवृत्तीही मंजूर झाली आहे. तिचा हा प्रवास थक्क करणारा आणि असंख्य विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणारा आहे.




शारदाची कौटुंबिक पार्श्वभूमी अतिशय सामान्य आहे. कुटुंबाकडे स्वतःची शेती नसल्याने आई-वडील मोलमजुरी करून उदरनिर्वाह करतात. अशा परिस्थितीत शारदाने आपले प्राथमिक शिक्षण (पहिली ते सातवी) गावातीलच जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत पूर्ण केले. त्यानंतर आठवी ते दहावीपर्यंतचे शिक्षण प्रबुद्ध हायस्कूल, मुरखळा (चक) येथे आणि अकरावी-बारावीचे शिक्षण चामोर्शी येथील शिवाजी जुनिअर कॉलेजमध्ये पूर्ण केले. बारावीनंतर तिच्या शैक्षणिक वाटचालीला निर्णायक वळण मिळाले. डॉ. पंकज नरुले यांनी तिची शिक्षणाची तळमळ ओळखून तिला पुढील दिशा दाखवली.

केवळ शारदालाच नव्हे, तर तिच्या आई-वडिलांनाही समुपदेशन करून त्यांनी उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहित केले. याच मार्गदर्शनातून शारदाने नागपूर येथील मातृ सेवा संघ इन्स्टिट्यूट ऑफ सोशल वर्क येथून बीएसडब्ल्यू (बॅचलर ऑफ सोशल वर्क) पदवीचे शिक्षण घेतले. येथेही तिने आपल्या गुणवत्तेची छाप पाडली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातून तिने गुणवत्ता यादीत पाचवे स्थान पटकावले.

नागपूरसारख्या शहरात राहून शिक्षण घेणे आर्थिकदृष्ट्या आव्हानात्मक होते. यावेळी ठाणे येथील विद्यादान सहाय्यक मंडळ तिच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले. या संस्थेने तिच्या पदवी आणि पुढील शिक्षणासाठी मोलाची शैक्षणिक व आर्थिक मदत केली. दरम्यानच्या काळात शारदामध्ये सामाजिक क्षेत्रातील आवड आणि चिकाटी अधिक दृढ झाली. या संपूर्ण प्रवासात संकल्प फाऊंडेशनचेही तिला मोठे मार्गदर्शन लाभले. बीएसडब्ल्यू पूर्ण केल्यानंतर तिने आपल्या ध्येयाकडे अधिक गांभीर्याने वाटचाल सुरू केली.

तिने शिव नाडर युनिव्हर्सिटीसाठी प्रयत्न केले. ही युनिव्हर्सिटी इन्स्टिट्यूशन ऑफ एमिनन्स म्हणून गौरविली गेली असून, भारतातील अव्वल दर्जाचे संशोधन आणि शिक्षण देणाऱ्या खासगी विद्यापीठांपैकी एक मानली जाते. अशा प्रतिष्ठित संस्थेत प्रवेश मिळवण्यासाठी तिने प्रवेश परीक्षा, गटचर्चा आणि मुलाखत अशा कठोर निवड प्रक्रियेला यशस्वीपणे सामोरे जात स्कूल ऑफ ह्युमॅनिटीज अँड सोशल सायन्सेसमधील एमए इन रुरल मॅनेजमेंट अभ्यासक्रमासाठी आपली निवड निश्चित केली.

आपल्या भागातील आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक समस्या तिने जवळून पाहिल्या आहेत. याच समस्यांवर काम करून आपल्या भागात परिवर्तन आणि विकास घडवून आणण्याच्या उद्देशाने तिने या अभ्यासक्रमाची निवड केली आहे. एका शेतमजुराच्या कन्येने घेतलेली ही गगनभरारी निश्चितच वाकडी गावाचाच नव्हे, तर संपूर्ण गडचिरोली जिल्ह्याचा गौरव वाढवणारी आहे.

## खासगी क्लासेसच्या शिक्षकासह विद्यार्थ्याचा समुद्रात बुडून मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. ९ :

सहलीवर जाणे शिक्षकासह विद्यार्थ्याच्या जीवावर बेतले आहे. रायगड जिल्ह्यातील काशीद बीच येथे अकोला शहरातील एका खासगी शिकवणी वर्गातील शिक्षक व विद्यार्थी सहलीसाठी गेले होते. त्यावेळी समुद्रात बुडून दोन जणांचा मृत्यू झाल्याची घटना शनिवारी सायंकाळी घडली. राम कुटे आणि आयुष रामटेके असे बुडून मृत्यू झालेल्या दोन जणांची नावे आहेत. डिसेंबर महिना हा सहलीचा काळ. या महिन्यात शाळा, महाविद्यालय व खासगी शिकवणी वर्गाच्या सहली पर्यटनस्थळी जात असतात.



याच प्रकारे अकोला शहरातील एका शिकवणी वर्गाचे १२ विद्यार्थी आणि तीन शिक्षक सहलीसाठी रायगड जिल्ह्यातील काशिद समुद्र किनाऱ्यावर गेले होते. त्यातील दोन विद्यार्थी आणि एक शिक्षक असे तीन जण पाण्यात बुडाले. त्यापैकी एक विद्यार्थी आणि एका शिक्षकाचा मृत्यू झाला असून एक विद्यार्थी सुखरूप आहे. राम कुटे (वय ६० वर्षे, रा. अकोला, शिक्षक), आयुष रामटेके (वय १९ वर्षे, रा. अकोला, विद्यार्थी) यांचा मृत्यू झाला. तिसरा बुडालेला आयुष बोबडे (वय १७ वर्षे, रा. अकोला ) हा विद्यार्थी सुखरूप आहे. मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी बोर्ली व मुरुड प्राथमिक आरोग्य केंद्रात पाठवण्यात आले आहेत. आयुष रामटेके हा शिकवणी क्लासेसचा विद्यार्थी नसून शिक्षकांच्या घराशेजारील राहणारा तरुण होता, असे काही शिक्षकांचे म्हणणे आहे.

# पार्थ पवारने श्रीखंड खाल्ले का?

## जमीन घोटाळ्याची सीबीआय चौकशी करावी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

महाराष्ट्रात सत्ता आणि भ्रष्टाचार यांच्यातील संबंध पुन्हा एकदा उघड झाले आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांच्यावर आता १,८०० कोटी रुपयांची सरकारी जमीन केवळ ३०० कोटी रुपयांना खरेदी केल्याचा आरोप आहे. या घोटाळ्यामुळे राज्यातील महायुती सरकारच्या नैतिकतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आज, आमदार आणि शहराध्यक्ष विकास ठाकरे आणि माजी मंत्री अनीस अहमद यांच्या नेतृत्वाखाली आणि महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीचे सरचिटणीस अतुल कोटेचा यांच्या नेतृत्वाखाली शेकडो काँग्रेस कार्यकर्ते नागपूरच्या चित्रोली येथील गांधी पुतळा चौकात रस्त्यावर उतरले आणि प्रचंड निदर्शने केली. "मत चोर, जमीन चोर - सिंहासन सोडा, खुर्ची सोडा" आणि "महायुती-महायुती... पुरे झाले




घोटाळे" अशा घोषणा देत निदर्शकांनी अजित पवारांचा तात्काळ राजीनामा मागितला. त्यांनी संपूर्ण जमीन घोटाळ्याची सीबीआयकडून चौकशी करण्याचे आवाहनही सरकारला केले. यावेळी काँग्रेसचे उपाध्यक्ष रमण पैगवार, माजी नगरसेवक जुल्फिकार अहमद भुट्टो, रमेश पुणेकर, नितीन साठवणे, दिनेश बानाबाकोडे, रिंकू जैन, श्रीकांत ढोलके, डॉ.मेहुल अडवाणी, वसीम खान, महेश श्रीवास, हलबा नेते रवि श्याम कोनडापुरे, रवी श्याम कोनडापूरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

काँग्रेसच्या उद्योग आणि व्यापार सेलचे प्रदेशाध्यक्ष अतुल कोटेचा म्हणाले, "हा केवळ जमिनीचा व्यवहार नाही तर सत्तेचा गैरवापर करून सार्वजनिक मालमत्तेचे वैयक्तिक फायद्यात रूपांतर करण्याचा घृणास्पद कट आहे. महायुती सरकारच्या प्रत्येक हालचालीवर आता संशय आला आहे.

# मुलानेच केला जन्मदात्याचा खून

■ महासागर प्रतिनिधी, भंडारा, दि. ९ :

लग्न न लावून दिल्याच्या कारणावरून मुलाने स्वतःच्या वडिलांवर विटेने हल्ला करून त्यांचा खून केल्याची धक्कादायक घटना लाखांदूर तालुक्यातील आथली गावात घडली आहे. शुक्रवारी रात्री सुमारे आठच्या सुमारास घडलेल्या या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. मृताचे नाव पुरुषोत्तम कुंभलवार (वय ५७) असे असून, आरोपी मुलाचे नाव प्रदीप पुरुषोत्तम कुंभलवार (वय ३३) असे आहे. पोलिसांनी घटनेनंतर काही तासांतच प्रदीपला अटक केली.


मिळालेल्या माहितीनुसार, पुरुषोत्तम कुंभलवार हे अल्पभूधारक शेतकरी असून त्यांना दोन मुलगे आहेत. ते दोघेही शेतमजुरीचे काम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. शुक्रवारी रात्री जेवण झाल्यानंतर पुरुषोत्तम, त्यांची पत्नी रेवता (वय ५१) आणि धाकटा मुलगा प्रदीप घरात गप्पा मारत बसले होते. मोठा मुलगा प्रेमकुमार (वय ३५) त्या वेळी बाहेर गेला होता. आमचे वय वाढत चालले आहे, तरी तुम्ही आमचे लग्न लावत नाही, अजून किती वाट पाहायची? असे म्हणत त्याने वडिलांवर आरोप केले. या शाब्दिक वादाचे रुप क्षणात रागात बदलले आणि संतापाच्या भरात प्रदीपने जवळच असलेल्या वीटेने वडिलांच्या डोक्यावर जोरदार वार केला.

# पार्थ पवारांना वाचवण्याचा प्रयत्न सुरू

■ महासागर प्रतिनिधी
बुलढाणा, दि. ९ :

राज्यातील राजकारण, मोंढवा जमीन गैरव्यवहार आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या भूमिकेवरून काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी महायुती सरकार आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर तीव्र निशाणा साधला आहे. अजित पवार यांच्याकडे देवेंद्र फडणवीस यांचे मोठमोठे घपले आहेत. त्यामुळेच पार्थ पवारांना वाचवण्याचा प्रयत्न सुरू आहे. राज्यात दलाल हे सरकार चालवत आहेत. अजित पवारांनी पुणे जमीन घोटाळा प्रकरणी तत्काळ राजीनामा द्यावा. पण हे बेशरम सरकार आहे, अशी टीका सपकाळ यांनी केली. ते बुलढाणा येथे पत्रकारांशी बोलत होते.

सपकाळ म्हणाले, मुंबई, पुणेच नव्हे तर तालुका पातळीवरसुद्धा जमीन घोटाळ्याचे रॅकेट सक्रिय आहे. पुण्यातील व्यवहारांमागे मोठ्या नेत्यांचा हात आहे. अजित पवारांकडे देवेंद्र



### हर्षवर्धन सपकाळांचा सरकारवर घणाघात

फडणवीस यांचे अनेक मोठे घपले आहेत. त्यांनी स्वतः ज्या जमिनी लाटल्या आहेत, त्याचे किस्से अजित पवारांकडे आहेत.

झोटिंग कमिटीचे अहवाल दुर्लक्षित केले जातात, पण दोषींना क्लीन चिट दिली जाते. त्यामुळे या सर्व प्रकरणाची चौकशी ईडीकडे जावी आण सर्वोच्च न्यायालयानेही दखल घ्यावी, अशी आमची मागणी असल्याचे हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

हर्षवर्धन सपकाळ यांनी आरोप केला की, पार्थ पवारांना वाचवण्यासाठी सरकार प्रयत्न करत आहे. ज्यांच्यावर गुन्हे दाखल झाले आहेत, त्यांना विजय माल्या पॅटर्नप्रमाणे देशाबाहेर पळवण्यात येत आहे. हे सरकार केवळ सत्तेच्या बचावासाठी तपास यंत्रणांचा गैरवापर करतं. आरएसएस प्रमुख मोहन भागवत यांच्यावरही सपकाळांनी तीव्र शब्दांत टीका केली.

शंभर वर्षांनंतरसुद्धा संघाने ठरवून घ्यावे की त्यांचे उद्दिष्ट नेमके काय आहे? मोहन भागवत नेहमी संभ्रमात असतात. आज त्यांचा प्रभाव ना भाजपवर राहिलेला आहे, ना महाराष्ट्राच्या राजकारणावर. पंतप्रधान नरेंद्र मोदी आता संघाचं ऐकत नाहीत. ७५ वर्षांनंतरच्या रिटायरमेंटचा सल्लाही त्यांनी फेटाळला. फडणवीस यांना अजित पवारांना सोबत घेऊ नका असे सांगितले, तरी त्यांनी घेतले.

